दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६४ वे अंक १८४) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२४ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार, दि.२० जुलै २०२५ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## चंद्रभागेत ३ महिला भाविक बुडाल्या; भोकरदनच्या दोघींचे मृतदेह आढळले, एक बेपत्ता

सोलापूर दि.१९ (प्रतिनिधी)- पंढरपुरातील चंद्रभागा नदीत बुडून ३ महिला भाविकांचा मृत्यू झाला आहे. यापैकी २ महिलांचे मृतदेह आढळले असून, एकीचा शोध सुरू आहे. मृतांपैकी दोघी जालना जिल्ह्यातील भोकरदनच्या असल्याची माहिती आहे. या घटनेमुळे पंढरपुरावर शोककळा पसरली आहे. यासंबंधीच्या माहितीनुसार, उजनी धरणातून पाणी सोडल्यामुळे चंद्रभागा नदी सध्या दुथडी भरून वाहत आहे. त्यामुळे पाण्याचा अंदाज येत नसल्यामुळे भाविकांसोबत बऱ्यावाईट घटना घडत आहेत. शनिवारी सकाळी ७ च्या सुमारास ३ महिला भाविक चंद्रभागा नदीत स्नानासाठी उतरल्या होत्या. यात जालन्याच्या भोकरदन येथील २ महिलांसह एका अनोळखी महिलेचा समावेश होता. त्या नदीत उतरल्या, पण पाण्याचा अंदाज न आल्याने त्या वाहून जाऊ लागल्या. ते पाहून नदीच्या किनाऱ्यावर असणाऱ्या इतर महिला भाविकांनी आरडाओरडा सुरू केला. पण पाण्याचा वेग जास्त असल्यामुळे मदत येईपर्यंत तिन्ही महिला बुडाल्या. त्यानंतर पोलिसांनी स्थानिक कोळी बांधवांच्या मदतीने मदतकार्य सुरू केले. त्यात सुनीता सपकाळ (४३) व संगीता सपकाळ (४०) या दोन महिलांचे मृतदेह आढळले. या दोन्ही महिला जालन्याच्या भोकरदन येथील रहिवासी आहेत. तर इतर एका अनोळखी महिलेचा शोध सुरू आहे.

# दोन्ही शिवसेना एकत्र येतील अशी आशा, अंबादास दानवे यांचे विधान

मुंबई दि.१९ (प्रतिनिधी)- शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आणि विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी दोन्ही शिवसेना एकत्र येण्याबाबत मोठे विधान केले आहे. शिवसेना फुटल्याची खंत असून, दोन्ही शिवसेना एकत्र याव्यात, अशी आशा असल्याचे ते म्हणालेत. शिवसेना म्हणून आपण एकत्र असले पाहिजे, शिवसेनेची एकत्रित ताकद राज्याला दिसली पाहिजे, असेही त्यांनी म्हटले. एकीकडे दोन्ही ठाकरे बंधू एकत्र येण्याची चर्चा सुरू असताना दुसरीकडे दोन्ही शिवसेना एकत्रित येण्याची अपेक्षा अंबादास दानवे यांनी केली.

अंबादास दानवे यांचा विधान परिषदेतील कार्यकाळ ऑगस्टमध्ये संपत आहे. या पार्श्वभूमीवर नुकत्याच पार पडलेल्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात त्यांचा निरोप समारंभ पार पडला. दानवेंच्या निरोप समारंभाच्या भाषणात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उद्धव ठाकरे यांची एकमेकांवरील टोलेबाजी पाहायला मिळाली. तसेच अंबादास दानवे यांच्या निरोप समारंभाच्या फोटोसेशन वेळी उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांनी एकमेकांकडे पाहणे टाळले होते आणि बाजूला बसणे देखील टाळले होते. आता अंबादास दानवेंच्या उपरोक्त विधानामुळे राज्याच्या राजकारणात नव्या चर्चा सुरू झाल्या आहेत.

अंबादास दानवे यांनी एबीपी माझाला नुकतीच मुलाखत दिली. यावेळी त्यांना दोन्ही शिवसेना एकत्र याव्यात असे तुम्हाला वाटते का? असा प्रश्न



विचारण्यात आला. त्यावर उत्तर देताना अंबादास दानवे म्हणाले, ''मी तेवढा मोठा नाहीये. पण निश्चित मी त्यादिवशी सुरुवातीलाच म्हटले की, मनाला वेदना झाल्या. जी संघटना अखंड ताकदवान होती, ठीक आहे, सत्तेत बसणे वगैरे, आम्ही काय सत्तेसाठी जन्माला आलेलो नाहीत. सत्ता येईल आणि जाईल. पण जी संघटना फुटली त्याच्या वेदना मनाला आणि हृदयाला झालेल्याच होत्या. या वेदना कधी ना कधी भरुन निघाव्यात असे मनाला वाटत असते.

अंबादास दानवे पुढे म्हणाले, सगळे एकत्र असले पाहिजे. सगळे लोकं असले पाहिजेत. कारण आपली शिवसेनेचे राज्य असले पाहिजे. आपली महाराष्ट्रात ताकद असली पाहिजे, असे मला शिवसैनिक म्हणून वाटतंच. आशा ठेवायला काही हरकत नाही.

''मी कुणाविषयी वैयक्तिक सल ठेवणार नाही. पण मनाला ही सल कायम आहे की, आपली एवढी मजबूत संघटना कुणीतरी फोडली. तिला कुणाची तरी दृष्ट लागली. संघटना तेवढीच मजबूत व्हावी हीच माझी इच्छा आहे'', असेही अंबादास दानवे म्हणाले.

# राज ठाकरेंविरोधात सुप्रीम कोर्टात याचिका, हिंदी भाषिकांना धमकावल्याचा आरोप

### गुन्हा दाखल करण्याची मागणी; अडचणी वाढण्याची शक्यता

मुंबई दि.१९ (प्रतिनिधी)- मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल झाली आहे. या याचिकेद्वारे त्यांच्यावर हिंदी भाषिकांविरोधात हिंसाचाराला खतपाणी घालण्यासह द्वेष पसरवण्याचा आरोप करण्यात आला आहे. या याचिकेमुळे राज ठाकरे यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे.

गत काही महिन्यांपासून महाराष्ट्रात हिंदीच्या सक्तीवरून मोठा वाद निर्माण झाला आहे. राज व उद्धव ठाकरे यांनी या निर्णयाला विरोध केल्यानंतर सरकारने यासंबंधीचा जीआर रद्दबातल केला. पण त्यानंतरही ठाकरे व सत्ताधारी भाजपच्या नेत्यांमध्ये या प्रकरणी आरोप प्रत्यारोपाच्या फैरी झडत आहेत. राज यांनी शुक्रवारी यासंबंधी मीरा भाईंदर येथे एक सभा घेतली होती. त्यात त्यांनी अमराठी नागरिकांना मुंबईत शांततेत व्यापार व्यवसाय करण्याचा इशारा दिला होता. मराठी व्यापारी नाहीत का? महाराष्ट्रात राहायचे असेल त मराठी शिका, नीट व्यापार करा. मस्ती दाखवली, तर दणका बसणार म्हणजे बसणार, असे ते म्हणाले होते.

त्यांच्या या इशाऱ्यानंतर हिंदी भाषिक नेत्यांनी त्यांच्यावर टीकेची झोड उठवली असताना आता थेट सर्वोच्च न्यायालयात या प्रकरणी याचिका दाखल करण्यात आली आहे. वकील घनश्याम उपाध्याय यांनी ही याचिका दाखल केली आहे. राज ठाकरे यांनी आपल्या भाषणाद्वारे हिंदी भाषिक लोकांविरोधात हिंसाचार (पान ४ वर)

# राष्ट्रवादीच्या विलिनिकरणावर भाजपला विचारावं लागेल; सुनील तटकरेंचे वक्तव्य

हिंगोली दि.१९ (प्रतिनिधी)- राष्ट्रवादीच्या विलिनीकरणावर कोणतीही चर्चा झाली नाही, जर विलिनीकरण करावं लागलं तर त्यासाठी भाजपला विचारावं लागेल असं वक्तव्य राष्ट्रवादीचे प्रवक्ते सुनील तटकरे यांनी केलं. आम्ही एनडीएत आहोत, त्यामुळे आमच्यासोबत येणाऱ्यांनाही एनडीएत राहावं लागेल असंही तटकरे म्हणाले. ते हिंगोलीत माध्यमांशी संवाद साधत होते.

राष्ट्रवादी विलिनीकरणाची चर्चा स्थानिक पातळीवरती सुद्धा नाही आणि वरिष्ठ पातळीवरही झाली नाही हे मी वारंवार स्पष्ट केलं आहे. ज्यावेळी असा काही प्रस्ताव असेल त्यावेळी कोअर कमिटी त्याबाबत निर्णय घेईल. पण त्यावर निर्णय घेत असताना, भाजपच्या नेतृत्वाला विचारावं लागेल असं सुनील तटकरे म्हणाले.

सुनील तटकरे म्हणाले की, ''आम्ही एनडीएमध्ये सहभागी झालोत त्यावेळी भारतीय जनता पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाशी बोललो. केंद्रीय नेतृत्वाने सहमती दर्शवली म्हणून आमचा सत्तेमधील सहभाग आहे. त्यामुळे अशा वेळेला कुठलाही मोठा राजकीय निर्णय घ्यायची शक्यता येईल त्यावेळेला भारतीय जनता पार्टीच्या वरिष्ठ तृत्वाशी बोलावं लागेल चर्चा करावी लागेल.''

सुनील तटकरे म्हणाले की, ''राज्यात समन्वय समितीची बैठक झाली (पान ४ वर)

# नाशिक हनी ट्रॅप प्रकरणाची आमच्याकडे सीडी, वेळ आली की तिकीट लावून दाखवू; विजय वडेट्टीवारांचा खळबळजनक दावा

नाशिक दि.१९ (प्रतिनिधी)- राज्यात गेल्या आठवडाभरापासून हनी ट्रॅप प्रकरणाची चर्चा होत आहे. ७२ आजी-माजी अधिकारी आणि काही बडे नेते हनी ट्रॅपमध्ये अडकले असून या हनी ट्रॅपचा सूत्रधार नाशिकचा असल्याची चर्चा आहे. या प्रकरणावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत उत्तर दिले होते. सध्या सभागृहात हनी ट्रॅपी प्रकरणाची चर्चा होतेय. पण ना हनी आहे ना ट्रॅप. नाना पटोलेंनी सभागृहात पेन ड्राईव्ह दाखवत बॉम्ब आणला होता असं समजतंय. पण नानाभाऊंचा बॉम्ब आमच्यापर्यंत आलाच नाही. ते



गृहखात्यापर्यंत पोहोचवलंच नाहीय, असा टोला लगावतानाच कोणत्याही आजी-माजी मंत्र्याची हनी ट्रॅपची तक्रार नाही, असे स्पष्टीकरण त्यांनी दिले. आता काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी नाशिकच्या हनी ट्रॅपची सीडी आमच्याकडे असल्याचा दावा केलाय.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, हनी ट्रॅपवरून ना हनी आहे ना ट्रॅप, असे मुख्यमंत्री म्हणाले. पण, त्या संदर्भात फार मोठी माहिती सरकारकडे देखील आहे आणि विरोधी पक्षाकडे देखील आहे. मागील काळात जी काही सत्तापालट झाली ती देखील अशाच सीडीमुळे झाली, इतकं मोठं ते प्रकरण आहे. त्यात खूप मोठी माणसं आहेत. त्यावर खूप काही बोलण्याची गरज नाही. ज्या वेळेस आम्ही ते दाखवू, त्यावेळेस आम्हाला दहा-वीस हजार रुपयांचे तिकीटच लावावे लागेल. ते तिकीट लावूनच आम्हाला चित्र दाखवावे लागेल. पण, त्यात निमंत्रित आणि विशिष्ट लोकांनाच बोलवावे लागेल एवढा मोठा भक्कम पुरावा त्यात आहे, असा दावा त्यांनी केलाय.

दरम्यान, यावर काँग्रेस नेते नाना पटोले म्हणाले की, सोमनाथ सूर्यवंशी यांच्या आईने ज्या पद्धतीने मुख्यमंत्री धडधडीत विधानसभेत खोटे बोलले, असे वक्तव्य केले. त्या आईचे अश्रू सुद्धा राज्याचे मुख्यमंत्री समजू शकत नाहीत. याचा अर्थ मुख्यमंत्र्यांनी काल दिलेले भाषण हेच खोटे होते, हे स्पष्ट होत आहे. मी अनेकदा सांगितले आहे की, महाराष्ट्रातले काही वरिष्ठ अधिकारी, (पान ४ वर)

# मोदीजी, ५ लढाऊ विमानांबद्दल सत्य काय आहे?; डोनाल्ड ट्रम्प यांच्या दाव्यानंतर राहुल गांधींचा सवाल

नवी दिल्ली दि.१९ (वृत्तसंस्था)- जम्मू काश्मीरच्या पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर दिलं होतं. भारत-पाकिस्तान संघर्षाबाबत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी याआधीही अनेकदा विधाने केलेले आहेत. मात्र, आज डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत-पाकिस्तान संघर्षासंदर्भात एक मोठा दावा केला. 'भारत-पाकिस्तान संघर्षादरम्यान ५ लढाऊ विमाने पाडण्यात आले', असं ट्रम्प यांनी म्हटलं. त्यांच्या या दाव्यानंतर चर्चांना उधाण आलं.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या या दाव्यानंतर आता लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सवाल विचारला आहे. ५ लढाऊ विमानांबद्दल नेमकं सत्य काय आहे? असा सवाल राहुल गांधी यांनी केला आहे. या संदर्भात राहुल गांधी यांनी डोनाल्ड ट्रम्प यांच्या वक्तव्याच्या व्हिडीओ एक्सवर (ट्विटर) शेअर केला आणि विचारलं की, ''मोदीजी, ५ विमानांबद्दल सत्य काय आहे? देशाला जाणून घेण्याचा अधिकार आहे'', असं राहुल गांधी यांनी म्हटलं आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर झालेल्या भारत-पाकिस्तान युद्धाबाबत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी महत्त्वपूर्ण विधान केलं. भारत-पाकिस्तान युद्धादरम्यान पाच विमाने पाडण्यात आली. मे महिन्यात झालेल्या शस्त्रविरामानंतर परिस्थिती शांत झाली असे डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. व्हाईट हाऊसमधील काही रिपब्लिकन खासदारांसोबतच्या भोजनादरम्यान ट्रम्प यांनी हे विधान केलं.

# विधानभवनाच्या लॉबीत झालेल्या मारहाणीच्या घटनेला मुख्यमंत्री फडणवीस हेच जबाबदार, हर्षवर्धन सपकाळ यांचा दावा

मुंबई दि.१९ (प्रतिनिधी)- विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान विधानभवन परिसरात हाणामारीची एक घटना घडली आणि त्या घटनेवरून राज्याचं राजकारण चांगलंच तापल्याचं पाहायला मिळालं. भाजपाचे आमदार गोपीचंद पडळकर आणि राष्ट्रवादीचे (शरद पवार) आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या कार्यकर्त्यांमध्ये हाणामारीची घटना घडली. या घटनेमुळे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित करण्यात आला. मात्र, त्यानंतर या प्रकरणी गोपीचंद पडळकर यांचे समर्थक आणि जितेंद्र आव्हाड यांच्या समर्थकाला पोलिसांनी अटक केलं.

दरम्यान, या प्रकरणावर बोलताना आता काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी गंभीर आरोप केला आहे. विधानभवनाच्या लॉबीत झालेल्या मारहाणीच्या घटनेला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच जबाबदार असल्याचा दावा हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. तसेच सध्या राज्यात चर्चेत असलेल्या हनीट्रॅपच्या विषयावरूनही सपकाळ यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली.

''आजपर्यंत कोणत्याही अधिवेशनादरम्यान अशा प्रकारची हाणामारीची घटना घडली नाही. हे अधिवेशन कशासाठी गाजलं? शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी गाजलं का? भाषेच्या प्रश्नांसाठी गाजलं का? राज्याच्या विकासाठी हे अधिवेशन गाजलं का? तर नाही. हे अधिवेशन गाजलं ते हाणामारीच्या घटनेने. कोणी बुक्के मारतो, तर कोणी चापटा मारतो, तर कोणी शिव्या काय देतात? एवढंच नाही तर सभागृहाच्या बाहेरही म्हणजे अक्कोलकोटमध्ये प्रविण गायकवाड यांच्यावर हल्ला झाला. त्या हल्लेखोराला भाजपाचे माजी प्रदेशाध्यक्ष फोन करून सांगतात की भिऊ नको मी तुमच्या पाठिशी आहे'', असं म्हणत हर्षवर्धन सपकाळ यांनी भाजपावर टीका केली. ''विधानभनाच्या लॉबीत हाणामारीची घटना घडते? मग या घटनेवरून आता मुख्यमंत्र्यांचं अभिनंदन करायचं का? या अशा घटनांना जबाबदार कोण? हे प्रकरणे आता हाताबाहेर चालले आहेत. विधानभनाच्या लॉबीतील हाणामारीच्या घटनेला थेट जबाबदार कोण असेल? तर या घटनेला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच जबाबदार आहेत'', असा आरोप हर्षवर्धन सपकाळ यांनी आज माध्यमांशी बोलताना केला आहे.

# वैष्णवी प्रकरणात तपास करून जालिंदर सुपेकरांना सुद्धा सहआरोपी करण्याची आवश्यकता

### विधीमंडळ समितीच्या अहवालात पोलिसांवर कडक ताशेरे

मुंबई दि.१९ (प्रतिनिधी)- हगवणे कुटुंबाच्या रानटी अत्याचाराला कंटाळून आत्महत्या केलेल्या वैष्णवी हगवणे प्रकरणामध्ये अनेक त्रुटी असल्याचं विधिमंडळाच्या महिला, बालकांच्या हक्क आणि कल्याण समितीच्या अहवालांमधून समोर आलं आहे. या समितीने पोलिसांच्या पोलिसांच्या भूमिकेवर कडक ताशेरे ओढताना जालिंदर सुपेकर यांची सखोल चौकशी करून त्यांना सहआरोपी करण्याची आवश्यकता असल्याचे म्हटले आहे. या अहवालाचा तपशील समोर आला असून यामध्ये जालिंदर सुपेकर यांच्या पत्नीच्या खात्यावर रुखवताच्या नावाखाली तब्बल दीड लाख रुपये ट्रान्सफर झाल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. त्यामुळे त्यांची सुद्धा चौकशी चौकशी करून त्यांना सुद्धा सहआरोपी करण्यात यावे, असेही अहवालामध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आलं आहे. त्यामुळे जालिंदर सुपेकर यांच्या अडचणी वाढण्याची चिन्हे आहेत.

या प्रकरणी हगवणे कुटुंबियांचे निकटवर्तीय असलेले पुण्यातील तत्कालीन पोलिस महानिरीक्षक जालींदर सुपेकर यांचा सहभाग व हस्तक्षेप तपासादम्यान समोर आला आहे. त्यामुळे (पान ४ वर)

# दिवस तुमचा, मैदान तुमचं, वेळ तुमची, कुठं येऊ सांगा?, मनसे नेत्याचे खासदार निशिकांत दुबेंना खुले आव्हान

नवी दिल्ली दि.१९ (वृत्तसंस्था)- राज्यात हिंदी भाषा आणि मराठी विरुद्ध अमराठी अशा मुद्यांवरून राजकारण तापलं आहे. काही दिवसांपूर्वी मिरा भाईंदरमध्ये झालेल्या मराठी विरुद्ध अमराठी मुद्यांवरून व्यापाऱ्यांच्या मोर्चाला प्रत्युत्तर देण्यासाठी मनसेच्या कार्यकर्त्यांनी अमराठी व्यापाऱ्यांच्या विरोधात मोर्चा काढला होता. त्यानंतर शुक्रवारी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची जाहीर सभा मिरा भाईंदरमध्ये पार पडली. या सभेत बोलताना राज ठाकरे हिंदी भाषा सक्तीच्या विरोधात आणि मराठी विरुद्ध अमराठी या मुद्यांवरून चांगलेच आक्रमक झाले होते.

यावेळी राज ठाके यांनी भाजपा खासदार निशिकांत दुबे यांच्या टीकेलाही प्रत्युत्तर दिलं. 'दुबे तुम मुंबई में आ जावोमुंबई के समंदर में डुबे डुबे कर मारेंगे' असं राज ठाकरे यांनी म्हटलं. त्यांच्या या विधानानंतर खासदार निशिकांत दुबे यांनी पुन्हा एक्सवर पोस्ट करत राज ठाकरेंना मीच हिंदी शिकवली, असं म्हणत मनसेला डिवचलं. दरम्यान, यानंतर आता मनसेचे नेते प्रकाश महाजन यांनी खासदार निशिकांत दुबे यांना खुलं आव्हान दिलं आहे. 'दिवस तुमचा, मैदान तुमचं, वेळ तुमची, कुठं येऊ सांगा?', असं प्रकाश महाजन यांनी एका वृत्तवाहीनीशी बोलताना म्हटलं आहे.

''राज ठाकरेंना तुम्ही काय हिंदी शिकवता? राज ठाकरेंच्या वडिलांनी मोहम्मद रफी यांच्याकडून मराठीत गाणे म्हणून घेतलेत. त्यामळे तुम्ही आम्हाला भाषा शिकवू नका. निशिकांत दुबेंपेक्षा राज ठाकरे यांची हिंदी कधीही चांगली आहे. आमचा भाषेला कधीही विरोध नाही आणि आम्ही कधीही भाषेला विरोध आहे असं म्हणत नाहीत'', असं प्रकाश महाजन यांनी म्हटलं. तसेच इशारा देताना प्रकाश महाजन म्हणाले की, ''निशिकांत दुबे यांना मी सांगतो की दिवस तुमचा, मैदान तुमचं, वेळही तुमची, कुठे येऊ हे फक्त सांगा. मग कोण कोणाला पटक पटक मारतं ते पाहू'', असा इशारा प्रकाश महाजन यांनी दिला आहे.

# अनोळखी लिंक, कॉल अन् मेसेज पासून सतर्क राहा, पीएम किसानचा २० वा हप्ता जारी करण्यापूर्वी केंद्र सरकारचा अलर्ट

नवी दिल्ली दि.१९ (वृत्तसंस्था)- पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या २० व्या हप्त्याच्या प्रतिक्षेत देशभरातील कोट्यवधी शेतकरी आहेत. पीएम किसान सन्मान निधीच्या २० व्या हप्त्याचे २००० रुपये कधी मिळणार याकडे शेतकऱ्याचं लक्ष लागलं आहे. या दरम्यान पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील खात्यावरुन शेतकऱ्यांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. अनोळखी लिंक, कॉल आणि मेसेजेस यापासून शेतकऱ्यांनी सावध राहाव, असं आवाहन करण्यात आलं आहे. याशिवाय पीएम किसान सन्मान निधीची अधिकृत वेबसाईट आणि पीएम किसान सन्मान निधीचं एक्स प्लॅटफॉर्मवर योजनेसंबंधातील खऱ्या अपडेटस मिळतील असं सांगण्यात आलं आहे.

शेतकरी भाऊ आणि बहिणींनी पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या नावावर सोशल मीडियावर पसरवण्यात येत असलेल्या खोट्या माहितीपासून सावध राहा. फक्त http://pmkisan.gov.in आणि @pmkisanofficial या वरुन मिळणाऱ्या अपडेटस वर विश्वास ठेवा. खोट्या लिंक, कॉल आणि मेसेजपासून दूर राहा, असं आवाहन शेतकऱ्यांना करण्यात आलं आहे. पीएम किसान सन्मान निधीच्या अपडेट अधिकृत सोशल मिडिया प्लॅटफॉर्म @pmkisanofficial वरुन मिळवा असं आवाहन करण्यात आलं आहे.

# निवडणूक आयोग म्हणजे शेंदूर फासलेला धोंड्या आहे-उद्धव ठाकरे

मुंबई दि.१९ (प्रतिनिधी)- केंद्रीय निवडणूक आयोगावर ठाकरे गटाचे प्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी हल्लाबोल केला. सामनाच्या महामुलाखतीत उद्धव ठाकरेंनी आयोगावर टीका केलीय. निवडणूक आयोग म्हणजे शेंदूर फासलेला धोंड्या आहे असं उद्धव ठाकरे म्हणाले. शिवसेना नाव, चिन्हं इतरांना देण्याचा धोंड्याला अधिकार नाही अशी घणाघाती टीका त्यांनी केली. तसंच देश अशांत, अस्थिर ठेवायचा हेच भाजपचं धोरण आहे, असं उद्धव ठाकरे म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदींची ७५ वर्षे भरत असल्याचा इशारा सरसंघचालकांनी दिलाय, असंही उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले.

उद्धव ठाकरेंनी सामनाला दिलेल्या मुलाखतीमध्ये लोकसभेचा आणि विधानसभेच्या निवडणुकीच्या निकालावर देखील भाष्य केलं आहे. जे तुम्ही लोकसभेला कमावलंत, ते विधानसभेला गमावलंत. फक्त सहा महिन्यांत हे कसं घडलं?, असा प्रश्न संजय राऊतांनी उद्धव ठाकरेंना विचारला. यावर विधानसभेच्या वेळी शेवटच्या दिवसापर्यंत खेचाखेच सुरू राहिली. तू तू मैं मैं झालं. त्याचा चुकीचा मेसेज लोकांमध्ये गेला, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

सगळ्या गोष्टींत हात वर करण्यात अर्थ नाही. काही गोष्टी जबाबदारीने स्वीकारल्या पाहिजेत. ईव्हीएम घोटाळा, मतदार यादी, बोगस मतदार या सगळयांवर आता चर्चा सुरू असल्याचं उद्धव ठाकरेंनी सांगितले. मतदार कसे वाढले हे लोकांसमोर आलंय. लाडकी बहीणसारख्या आता फसव्या ठरलेल्या योजना याचा परिणाम झाला. निवडणूक मोठी असली की, वाद थोडे कमी असतात. निवडणुकीचा मतदारसंघ छोटा झाला की, स्पर्धा वाढत जाते. लोकसभेच्यावेळी महाविकास आघाडीत खेचाखेची झाली. आम्ही त्या वेळी चार-चार, पाच-पाच वेळा जिंकलेले मतदारसंघ आपल्याला जिंकायचंय म्हणून सोडून दिले, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

विधानसभेच्या वेळी शेवटच्या दिवसापर्यंत खेचाखेच सुरू राहिली तू तू मैं मैं झालं. त्याचा चुकीचा मेसेज लोकांमध्ये गेला. लोकसभेला प्रचार करताना चिन्ह नसलं तरी उमेदवार होते, विधानसभेला चिन्ह होतं, पण जागा कोणत्या आणि जागा मिळाल्यानापुर उमेदवारी कोणाला द्यायची हे निश्चित नव्हतं. ही चूक होती. ती पुढे सुधारली पाहिजे. ती चूक पुन्हा करायची असेल तर एकत्र येण्याला अर्थ राहत नाही, असं उद्धव ठाकरे म्हणाले. यावर समन्वयाचा अभाव होता?, असं संजय राऊतांनी विचारले. यानंतर समन्वयाच्या अभावापेक्षाही लोकसभेचे यश हे सगळ्यांच्या डोक्यात गेलं होतं, असं मत उद्धव ठाकरेंनी व्यक्त केलं. लोकसभेच्या वेळी आपल्याला जिंकायचं आहे हे आपलेपण होतं, विधानसभेला मला जिंकायचंय हा आपल्यात जो भीपणा आला तेव्हा पराभव आला. त्यात शेतकरी कर्जमाफी वगैरे तांत्रिक बाबी होत्या, असं उद्धव ठाकरेंनी स्पष्ट केलं.

# रा.स्व. संघ प्रणित संस्थेतर्फे केरळमध्ये ज्ञान सभा; सरसंघचालक संबोधित करणार

नवी दिल्ली दि.१९ (वृत्तसंस्था)- गुजरात, मध्य प्रदेश, उत्तराखंड आणि पुद्दुचेरी सारख्या राज्यांतील कुलगुरू, शिक्षणतज्ज्ञ आणि शिक्षणमंत्र्यांसह सुमारे ३०० हून अधिक उच्च शिक्षणतज्ज्ञ केरळच्या कलाडी येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ प्रणित शिक्षा संस्कृती उत्थान न्यासतर्फे आयोजित ज्ञान सभा परिषदेमध्ये सहभागी होणार आहेत. सरसंघचालक मोहन भागवत या ज्ञानसभेला संबोधित करणार आहेत. सरसंघचालक मोहन भागवत चार दिवसांच्या केरळ दौऱ्यावर जाणार आहेत. मोहन भागवत यांचा हा दौरा अनेक प्रकारे खास असणार आहे. या दौऱ्यात ते शिक्षण क्षेत्राशी संबंधित अनेक प्रतिष्ठित व्यक्तींबरोबर त्यांच्या गाठीभेटी होणार आहेत.

२५ ते २८ जुलै दरम्यान या ज्ञानसभेचे आयोजन करण्यात आले असून 'एज्युकेशन फॉर डेव्हलप इंडिया' या विषयावर ही परिषद केंद्रित असेल. २७ जुलै रोजी सरसंघचालक मोहन भागवत यांचे भाषण हे परिषदेचे प्रमुख आकर्षण असेल. या परिषदेत ते शिक्षणातील भारतीयीकरण आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी) २०२० ची अंमलबजावणी आदी विषयांवर चर्चा होणार आहे.

गायत्री परिवार, आर्ट ऑफ लिव्हिंग, रामकृष्ण मिशन, चिन्मय मिशन आणि विवेकानंद योग अनुसंधान केंद्र यांसारख्या आघाडीच्या आध्यात्मिक आणि शैक्षणिक (पान ४ वर)

# हिंदवी स्वराज्याचे साक्षीदार विश्वव्यापी...!

मराठी मनाला आनंद वाटेल अशी घटना मागील आठवड्यात घडली. महाराष्ट्राला अभिमान वाटणारी ही घटना आहे. महाराष्ट्राची अस्मिता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पराक्रमाची साक्ष देणाऱ्या महाराष्ट्रातील ११ गडकिल्ल्यांचा जागतिक वारसास्थळामध्ये समावेश झाला. छत्रपती शिवरायांच्या हिंदवी स्वराज्यातली स्थापत्य कला जागतिक स्तरावर पोहोचली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य आणि पराक्रमाचे खऱ्या अर्थाने जिवंत साक्षीदार असणारे हे गडकिल्ले जागतिक स्तरावर पोहोचले आहेत. महाराष्ट्रातील हे गडकिल्ले महाराष्ट्रातील जनतेला माहिती होतेच; परंतु त्याला आता युनेस्कोमध्ये स्थान मिळाल्यामुळे विश्वव्यापी झाले आहेत.

आज या गडकिल्ल्यांवर हजारो पर्यटक येत असतात. मराठा साम्राज्याच्या शौर्याची साक्ष असणारे हे गडकिल्ले एकाचवेळी युनेस्कोच्या नकाशावर यावेत हे खरं तर मराठी मनाला सुखद अशी घटना आहे.

कोकणातील सिंधुदुर्ग, विजयदुर्गाबरोबरच अन्य किल्ल्यांचा समावेश आहे. रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेला शिवनेरी, लोहगड, साल्वेर, सुवर्णदुर्ग, खांदेरी, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग तामिळनाडुतील जींजी या प्रत्येक किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाच्या पाऊलखुणा उमटलेल्या आहेत. महाराष्ट्रातील प्रत्येक गडकिल्ला छत्रपती शिवरायांच्या व्यवस्थापनाचा स्थापत्य वैशिष्ट्यासह बांधण्यात आला आहे. सिंधुदुर्ग आणि विजयदुर्ग हे किल्ले तर समुद्रातच उभे आहेत.

विजयदुर्ग किल्ला छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात आरमारी तळ म्हणून ओळखला जायचा. आजवर या गडकिल्ल्यांची बरीच पडझडही झाली. पुरातत्त्व विभागाच्या सुधारणांना फारच मर्यादा होत्या. आता युनेस्कोच्या जागतिक वारसास्थळात या गडकिल्ल्यांचा समावेश झाल्याने साहजिकच राज्य आणि केंद्र सरकारकडून देखभाल दुरुस्तीसाठी खर्च केला जाऊ शकतो. जागतिक स्तरांच्या वारसास्थळांची जपणूकही होऊ शकते. महाराष्ट्र सरकार आणि केंद्र सरकारने महाराष्ट्रातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या आणि मराठा साम्राजाचा इतिहास जगासमोर युनेस्कोच्या माध्यमातून केला आहे.

कोकणात गेल्या काही वर्षांत पर्यटक मोठ्या प्रमाणावर येत आहेत. कोकणातील निसर्ग, स्वच्छ सुंदर आणि आकर्षण ठरणारे समुद्र किनारे यामुळे साहजिकच पर्यटकांचा ओघ वाढला आहे; परंतु युनेस्कोच्या रेकॉर्डनंतर जागतिक स्तरातील पर्यटकांचा ओघ भविष्यात मोठा वाढणार आहे. मराठा साम्राज्याच्या पराक्रमाचा इतिहास देशपातळीवरही माहीत होता. आता इतिहासाची, पराक्रमाची पानं जागतिक स्तरांवर उलगडली जात आहेत.

एकीकडे मराठ्यांच्या युद्धनीतीवर प्रकाश पडेल. कोकणातील ही वारसास्थळ या पुढच्या काळात केवळ पर्यटन स्थळ असणार नाहीत, तर सर्वांगाने जागतिक स्तरावरचा येणारा पर्यटक त्यांच्या-त्यांच्या दृष्टिकोनातून अभ्यास करत राहिल. यातून छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास, त्यांचा पराक्रम, त्यांच्या शौर्यगाथा नव्याने जगासमोर मांडल्या जातील. त्याचा निश्चितपणे फायदा कोकणातील पर्यटन वाढीला होऊ शकेल. आजवर केवळ इतिहासप्रेमी, इतिहास अभ्यासकच या गडकिल्ल्यांच्या भेटीला जात होते; परंतु यापुढच्या काळात सर्वच पर्यटक या जागतिक वारसास्थळांना भेटी देतील. आता या जागतिक वारसा यादीत जरी भारताचं आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्त्व अधोरेखित झाले असले तरीही भविष्यात या युनेस्कोच्या यादीतील वारसास्थळं त्याच पद्धतीने जपली पाहिजेत.

यापुढे येणाऱ्या पर्यटकांना आणि स्थायिक असणाऱ्या सर्वांनाच स्वत:ला काही शिस्त अंगीकारणे आवश्यक आहे. बऱ्याच पर्यटनस्थळांवर रिकाम्या पाण्याच्या बाटल्या अशाच फेकल्या जातात. समुद्र किनाऱ्यांवर जेव्हा साफसफाई केली जाते तेव्हा तर ढीगभर कचरा, रिकाम्या बाटल्या सापडतात. आपण एक बाटली फेकली म्हणून काय फरक पडतो असा काहीसा गैरसमज करून घेऊन परिसर अस्वच्छ करण्यात हातभार लावला जातो.

कोणी सांगून, बोलून शिस्त लागत नाही. प्रत्येकाने ठरवूनच ती पाळावी लागेल. आज युनेस्कोच्या यादीत आपल्या महाराष्ट्रातील, कोकणातील वारसास्थळांचा समावेश होणं ही घटना कोकणच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद करण्याजोगी आहे. सिंधुदुर्ग, विजयदुर्ग या किल्ल्यांचा समावेश असणं कोकणच्या पर्यटन विकासात किती भर घालणार आहे, याचा विचारही कोकणवासीयांना करता येणार नाही. यापुढे कोकणात येणारा पर्यटक हा जगभरातून येणारा असेल. या आंतरराष्ट्रीय पर्यटकाला आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी आपली आहे. यानिमित्ताने येणारा पर्यटक कोकणातच थांबला पाहिजे, राहिला पाहिजे. जगातून येणारा पर्यटक या पर्यटनस्थळांवर येऊन पैसे खर्च करण्याच्या मानसिकतेत असेल; परंतु येणाऱ्या पर्यटकांची मानसिकता जाणून त्याप्रमाणे त्यांना आनंदी वातावरण निर्माण करणे आणि पर्यटक आनंदी कसा राहील हे पाहण्याची जबाबदारी आपलीच असणार आहे.

अनेक संस्था, व्यक्ती, केंद्र, राज्य सरकार या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांचे हे मोठे फलित आहे. कोकणातील ही वारसास्थळे पर्यटकांचा मोठा ओघ वाढवणारी आहेत. कोकणासाठी भाग्याची ही बाब आहे. महाराष्ट्राला जशी ती अभिमानास्पद आहे त्याचप्रमाणे कोकणालाही ही बाब मान उंचावणारी आहे. आपणाकडे वारसा जतन केलेला होताच यानिमित्ताने तो जागतिक स्तरावर मान्यता प्राप्त झाला आहे. युनेस्कोने त्यावर मोहोर उठवली. युनेस्कोच्या यादीत वारसास्थळांचा समावेश झाला हे आपण जपले पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्यगाथा आणि छत्रपतींच्या पराक्रमाची साक्ष ठरणारे हे गडकिल्ले विश्वव्यापी झाले आहेत. आपल्या महाराजांच्या पराक्रमांच्या यशोगाथा ऐकताना निश्चितपणाने अंगावर रोमांच उभे राहतात. आपल्या छत्रपती शिवाजी महाराजांचा दृष्टिकोन, दूरदृष्टी प्रत्येक बाबतीतले बारकावे या सर्वांबद्दलची माहिती आता या पुढच्या काळात जगाच्या केवळ नकाशावर असणार असे नाही, तर त्यांच्या वैशिष्ट्यांची चर्चाही जागतिक स्तरावर होतील. छत्रपतींच्या या इतिहासाच्या कथा जगाला प्रेरणा देत राहतील. यामुळेच कोकणासाठी ही फार मोठी बाब आहे.

# ‘वंदे भारत’ रेल्वेसेवा सर्वच जिल्ह्यांना हवीहवीशी वाटणारी



**जालना**-मुंबई अशा धावणाऱ्या वंदे भारत एक्स्प्रेसचा विस्तार नांदेडपर्यंत करण्यात येणार आहे. देशाचे माजी रेल्वे राज्यमंत्री तथा मराठवाड्याचे नेते रावसाहेब दानवे यांनी यासाठी पुढाकार घेतला होता. २८ ऑगस्टपासून ही रेल्वेसेवा नांदेडवरून सुरू होणार आहे; परंतु या विस्ताराला छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून प्रचंड विरोध होत आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार ही रेल्वे जालना ते मुंबई या दरम्यानच असावी; परंतु नांदेडवरून ही रेल्वे सुटत असताना छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील प्रवाशांची प्रचंड गैरसोय होणार आहे. त्याचबरोबर या रेल्वेच्या वेळेवर फरक पडणार आहे. त्यामुळे मराठवाड्यात औद्योगिकदृष्ट्या अग्रेसर असलेल्या छत्रपती संभाजीनगरमधील विकासकामांना खीळ बसेल, असे तेथील अनेकांचे म्हणणे आहे. 'वंदे भारत' रेल्वेसेवा सर्वच जिल्ह्यांना हवीहवीशी वाटणारी आहे. एकीकडे या विस्तारामुळे मराठवाड्यातील नांदेड व परभणी जिल्ह्यातील नागरिकांनी आनंदोत्सव साजरा केला; परंतु त्या आनंदावर विरजण पडावी अशीच घटना छत्रपती संभाजीनगरमधून समोर येत आहे. छत्रपती संभाजीनगरमधील नागरिकांच्या म्हणण्यानुसार नांदेडच्या राजकारणी मंडळींनी दबाव आणून ही रेल्वे पळवून नेली. नांदेड ते मुंबई हे ६०८ किलोमीटरचे अंतर वंदे भारत एक्स्प्रेसने ६४ किलोमीटर प्रति तास या गतीने ९ तास २५ मिनिटांत पूर्ण करणार आहे.

रेल्वेसेवेचा जेवढा विस्तार होईल तेवढा सर्वसामान्य जनतेबरोबरच देशालाही फायदा असतो. देशभरात अनेक रेल्वेंचा विस्तार करण्यात आला आहे. त्या विस्तारामध्ये वंदे भारतचाही समावेश आहे. मराठवाड्यात नांदेड या शेवटच्या जिल्हापर्यंत वंदे भारतचा विस्तार केल्यामुळे टोकाच्या नागरिकांना मुंबईला जाण्यासाठी कमी वेळेचा पर्याय उपलब्ध झाला आहे; परंतु ही सेवा छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यातील व्यापाऱ्यांना तसेच नागरिकांना गैरसोयीची ठरत आहे. अशी आरोळी ठोकून छत्रपती संभाजीनगर येथील नागरिकांनी या विस्ताराला विरोध दर्शवून दिल्ली गाठली आहे. प्रस्तावित नांदेड ते मुंबई वंदे भारत एक्स्प्रेसला नांदेड ते छत्रपती संभाजीनगर दरम्यान वीस मिनिटांचा स्लॅक टाईम आहे.

छत्रपती संभाजीनगर ते नाशिक दरम्यान तीस मिनिटांचा तर नाशिक ते मुंबई दरम्यान पुन्हा ३० मिनिटांचा असा एकूण जवळपास दीड तासांचा अनावश्यक स्लॅक टाईम कमी केल्यास नांदेड-मुंबई हा रेल्वे प्रवास केवळ आठ तासांत शक्य होऊ शकतो. दक्षिण मध्य रेल्वेने या स्लॅक टाईमवर विशेष लक्ष दिल्यास नांदेडवरून सकाळी ५ वाजता निघणारी वंदे भारत मुंबईला दुपारी १ वाजता पोहोचू शकते व छत्रपती संभाजीनगर तसेच जालना जिल्ह्यातून होत असलेला विरोध यामुळे संपू शकतो, असे रेल्वे खात्यातील काही तज्ज्ञांचे म्हणणे आहे. मराठवाड्याचे भाजपचे नेते तथा माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या जालना जिल्ह्यातून ही रेल्वे सध्या सकाळी ५ वाजता सुटत आहे. त्यानंतर छत्रपती संभाजीनगर येथून सकाळी पावणेसहा वाजता ही रेल्वे मुंबईसाठी रवाना होते. मनमाड-नाशिक रोड-कल्याणमार्गे ठाणे-दादर व त्यानंतर मुंबईला ही रेल्वे सकाळी ११ वाजून ५५ मिनिटांना पोहोचते. ही रेल्वे १२ बाराच्या अगोदर मुंबईला पोहोचत असल्यामुळे त्याचा फायदा जालना व छत्रपती संभाजीनगर येथील उद्योजकांना तसेच सर्वसामान्य नागरिकांना होतो; परंतु या रेल्वेचा नांदेडपर्यंत विस्तार होत असल्याने ही रेल्वे सकाळी ५ वाजता नांदेडवरून सुटेल व दुपारी अडीच वाजता मुंबईला पोहोचेल या सर्व प्रस्तावित बदलामुळे जालना व छत्रपती संभाजीनगर येथील नागरिकांचा ताळमेळ मुंबईला ये-जा करण्यासाठी बसणार नाही. यामुळे तेथून या विस्ताराला प्रचंड विरोध होत आहे.

तसे पाहिले तर नांदेडवासीयांसाठी वंदे भारत एक्स्प्रेस सुरू होऊन देखील फायद्याची ठरणार नसल्याचे चित्र दिसत आहे. ही वंदे भारत सध्या आठ डब्यांची आहे; परंतु पुढील ऑगस्ट महिन्यात नांदेडवरून जेव्हा ही रेल्वे धावणार आहे, त्यासाठी त्याला बारा अतिरिक्त डबे जोडून ही वंदे भारत २० डब्यांची असणार आहे. नांदेड ते पूर्णा जंक्शन हे अंतर केवळ अर्ध्या तासाचे आहे व पूर्णा येथून दररोज सकाळी पावणेसहा वाजता मुंबईला जाणारी शताब्दी एक्स्प्रेस दुपारी साडेतीन वाजता मुंबईला पोहोचते.

हिंगोली ते मुंबई अशी धावणारी शताब्दी एक्स्प्रेस नांदेडवासीयांना देखील सोयीची असताना सकाळच्या वेळेतच वंदे भारत या रेल्वेला नांदेडपर्यंत का वाढविले? अशी विचारणा जालना व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून होत आहे. याच वंदे भारतमुळे छत्रपती संभाजीनगर व नांदेड या दोन जिल्ह्यांत वादाची ठिणगी पडली आहे. या दोन्ही जिल्ह्यांतील उद्योजक तथा नागरिक संबंधित पुढाऱ्यांना प्रश्न विचारून तसेच सोशल मीडियावर याबाबत चर्चा करून नेत्यांना टार्गेट करत आहेत.

वंदे भारत नांदेडपासून सुरू व्हावी यासाठी माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान खासदार अशोक चव्हाण, नांदेडचे काँग्रेसचे खासदार रवींद्र चव्हाण, परभणीचे खासदार बंडू जाधव, खासदार अजित गोपछडे यांनी दिल्ली दरबारी पाठपुरावा केला; परंतु या सर्व राजकीय मंडळींना दक्षिण मध्य रेल्वे अंतर्गत तेलंगणात असलेली निजामबाद ते तिरुपती धावणारी रॉयलसीमा एक्स्प्रेस नांदेडपर्यंत आणता आली नाही; परंतु मराठवाड्यातीलच राजधानीची एक्स्प्रेस नांदेडकरांनी पळिवली. अशा शब्दात नांदेडच्या नेत्यांवर मराठवाड्यातून विशेषतः छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यातून टीकेची झोड उठत आहे. रॉयलसीमा एक्स्प्रेस ही तिरुपतीला जाण्यासाठी नांदेडकरांना अतिशय उपयुक्त रेल्वे ठरू शकते; परंतु तेलंगणातील खासदार कुठल्याही परिस्थितीत सदरील रेल्वे नांदेडपर्यंत जाऊ द्यायला तयार नाहीत व या रेल्वेचा नांदेडपर्यंत विस्तार व्हावा या दृष्टीने नांदेडची नेतेमंडळी प्रयत्नात कमी पडत आहे, हे वास्तव आहे.

**रेल्वे सेवेचा बोजवारा**

अगोदरच मराठवाड्यात रेल्वेसेवेचा बोजवारा उडालेला आहे. दक्षिण मध्य रेल्वे अंतर्गत नांदेडला रेल्वेचे डीआरएम ऑफिस आहे. या ठिकाणाहून तेलंगणा व कर्नाटक या दोन राज्यांना जोडणाऱ्या रेल्वे सुरू असतात; परंतु महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबईसाठी नांदेडवरून आणखी स्वतंत्र रेल्वेची नितांत गरज आहे. याबरोबरच मराठवाड्यातील नागरिकांसाठी पुण्याला जाण्यासाठी सोयीच्या वेळेत रेल्वेसेवा हवी आहे. सध्या मराठवाड्यातून पुण्याला जाण्यासाठी असलेल्या रेल्वेच्या वेळेबाबत प्रवासी वर्गाची प्रचंड तक्रार आहे. एकीकडे तेलंगणाची राजधानी असलेल्या हैदराबादला नांदेडवरून १५ पेक्षा अधिक रेल्वे धावतात; परंतु त्या तुलनेत महाराष्ट्राच्या राजधानीला म्हणजेच मुंबईला जाण्यासाठी नेहमीच रेल्वे तिकिटांचा तुटवडा असतो. या बाबीकडे रेल्वे खात्याने तसेच मराठवाड्यातील पुढाऱ्यांनी लक्ष देणे गरजेचे आहे; परंतु हे करण्याऐवजी मराठवाड्यातील नेतेमंडळी वंदे भारतवरून एकमेकांवर आगपाखड करण्यात धन्यता मानत आहेत. कोरोना काळात बंद करण्यात आलेली मुंबईहून नागपूरपर्यंतची नंदिग्राम एक्स्प्रेस अद्यापही नागपूरपर्यंत धावत नसल्याने त्याबाबत मराठवाड्यातील नेतेमंडळी मूग गिळून गप्प का बसले आहेत, असाही प्रश्न प्रवासी वर्गातून उपस्थित होत आहे.

# शब्दांपेक्षा कृतीवर विश्वास - डॉ. अनुपम टाकळकर यांच्या नेतृत्वात इंडियन मेडिकल असोसिएशनची सातत्यपूर्ण सेवा, सचिव डॉ. लक्कास यांची साथ

## ‘आयएमए कनेक्ट’ उपक्रमांतर्गत ‘आरंभ’ शाळेत विशेष मुलांचे आरोग्य परीक्षण.

## इंडियन मेडिकल असोसिएशनचे समाजभिमुख कार्य पुन्हा एकदा अग्रभागी

छत्रपती संभाजीनगर, दि. १९ (प्रतिनिधी) - इंडियन मेडिकल असोसिएशन, छत्रपती संभाजीनगर शाखेच्या ‘आयएमए कनेक्ट’ या सामाजिक उपक्रमांतर्गत आज आरंभ शाळा येथे स्वतःच्या जगात रममाण असलेल्या (Autistic) मुलांसाठी विशेष आरोग्य परीक्षण व समुपदेशन सत्र घेण्यात आले.

हा उपक्रम ‘आयएमए कनेक्ट’ मालिकेतील चौथा कार्यक्रम असून, याआधी मातोश्री वृद्धाश्रम, भगवानबाबा अनाथाश्रम व विशेष मुलांची निवासी केंद्रे येथे सेवा पोहोचविण्यात आली होती. विशेष म्हणजे, हा उपक्रम IMA च्या ग्रामीण सेवा उपक्रमांपेक्षा वेगळा असून, शहरी भागातील दुर्लक्षित घटकांपर्यंत वैद्यकीय सेवा पोहोचवण्याचा प्रयत्न यातून दिसतो. ग्रामीण भागात आओ गाव चले या उपक्रमांतर्गत तीन गावे दत्तक घेण्यात आलेली आहेत आणि तेथे मोठ्या प्रमाणावर काम सुरूच आहे.

‘आयएमए छत्रपती संभाजीनगर’ ही शाखा केवळ दवाखान्यापुरती मर्यादित न राहता, समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्यसेवा पोहोचवण्यासाठी नेहमीच पुढे असते. "Caring Beyond Clinics' हे ब्रीदवाक्य प्रत्यक्ष कृतीतून साकार करणाऱ्या या शाखेचे विविध उपक्रम राज्यभर उदाहरण म्हणून ओळखले जात आहेत.

**‘आयएमए अध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर म्हणाले :** ‘आयएमए कनेक्ट’ हा केवळ आरोग्य परीक्षणापुरता मर्यादित उपक्रम नाही, तर तो संवेदनशील समाजाच्या जडणघडणीचा एक प्रयत्न आहे. ही मुलं वेगळ्या गरजा घेऊन आपल्यासमोर येतात, आणि आपण डॉक्टर म्हणून त्यांच्या मनाशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हा कार्यक्रम हृदयस्पर्शी ठरला. विशेषतः अशा गरजू आणि दुर्लक्षित गटांमध्ये वैद्यकीय सेवा पोहोचवणे हे आमचे ध्येय आहे. केवळ गावांमध्ये नव्हे तर शहरातील दुर्लक्षित घटकांनाही या सेवेचा लाभ मिळालाच पाहिजे.

आयएमए सचिव डॉ. योगेश लक्कास यांनी सांगितले : ‘आयएमए कनेक्ट’ अंतर्गत भविष्यात अशा अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

या उपक्रमात डॉ. दत्ता कदम (अध्यक्ष - IMA Connect), डॉ. गौरव साळवे (संयोजक) यांच्यासह IMA चे अनेक सन्माननीय सदस्य सहभागी झाले होते. ‘अरे गाव चले’ उपक्रमही यशस्वीरीत्या सुरू - याच वेळी, आयएमएच्या दुसऱ्या उपक्रमांतर्गत रविवार, २१ जुलै रोजी ग्रामीण भागातील ‘अरे गाव चले’ ह्या उपक्रमासाठी नियोजन करण्यात आले आहे.






- IMA छत्रपती संभाजीनगर - वैद्यकीय क्षेत्रातील सेवाभावाचा मानबिंदू!
- समाजाशी बांधिलकी जपणारी संघटना.
- नावीन्यपूर्ण सामाजिक उपक्रम राबविणारी आघाडीची शाखा.
- देशभरात प्रेरणादायी उदाहरण ठरणारे वैद्यकीय कार्य.

# सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल - शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे जागतिक प्लास्टिक सर्जरी दिवस उत्साहात साजरा

छत्रपती संभाजीनगर, दि. १९ (प्रतिनिधी) -सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील प्लास्टिक सर्जरी विभाग, प्लास्टिक सर्जरी असोसिएशन, खचअ महाराष्ट्र अचड यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक प्लास्टिक सर्जरी दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून बुलढाणा वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. कैलास झिने, महात्मा गांधी वैद्यकीय महाविद्यालयाचे उपाधिष्ठाता व सर्जरी विभागाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण सूर्यवंशी, महाराष्ट्र प्लास्टिक सर्जरी असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. जितेन कुलकर्णी, उपाधिष्ठाता डॉ. विनोद मुंदडा, डॉ. गायत्री तडवळकर आदी मान्यवर उपस्थित होते.

वैद्यकीय विद्यार्थी, प्लास्टिक सर्जन आणि विविध विभागप्रमुखांनी ‘हितगुज‘ या चर्चासत्रात उत्स्फूर्त सहभाग घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्लास्टिक सर्जरी विभागाच्या प्रमुख डॉ. उज्वला दहिफळे यांनी केले. त्या म्हणाल्या, ‘प्लास्टिक सर्जरी म्हणजे केवळ चेहरा बदलणे किंवा भाजल्यावर त्वचा चिटकवणे नाही, तर ही एक प्रगत, वैज्ञानिक आणि कलात्मक शाखा आहे. ‘प्लास्टिक’ हा शब्द ग्रीक भाषेतील ‘प्लास्टिकोस’ या शब्दावरून घेतला असून, त्याचा अर्थ 'आकार देणे' असा होतो. भारतीय शास्त्रज्ञ सुश्रुत यांनी प्राचीन काळातच पुनर्निर्माण शस्त्रक्रियेचे वर्णन केले असून, आजची प्लास्टिक सर्जरी ही त्याच परंपरेचा आधुनिक विस्तार आहे.’

तसेच, त्या म्हणाल्या, ‘सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये रुग्णांची संख्या सतत वाढत असून, अधिष्ठाता डॉ. सुक्रे व डॉ. वैशाली उणे यांच्या मार्गदर्शनाखाली आमची टीम उत्कृष्ट सेवा देत आहे. घाटी हॉस्पिटलमधील मोफत औषधोपचारामुळे आमच्या शस्त्रक्रिया अधिक परिणामकारक होतात.’



डॉ. शिवाजी सुक्रे यांनी सर्व सुपर स्पेशालिटी डॉक्टर्सच्या कार्याची प्रशंसा केली व सांगितले की, ‘कोणतीही गोष्ट रुग्णसेवेसाठी अपुरी पडू दिली जाणार नाही. वैद्यकीय महाविद्यालय आता मराठवाडा आणि खानदेशातील रुग्णांसाठी एक महत्त्वाचे केंद्र बनले आहे; त्यामुळे पुणे-मुंबईला जाण्याची गरज उरलेली नाही.‘

डॉ. प्रवीण सूर्यवंशी यांनी ङ्गफादर ऑफ प्लास्टिक सर्जरीङ्ग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सुश्रुत यांच्याविषयी माहिती दिली आणि अशा चर्चासत्रातूनच खरे वैद्यकीय विद्यार्थी घडतात, असे मत व्यक्त केले. डॉ. जितेन कुलकर्णी यांनी विविध रुग्णांवर झालेल्या शस्त्रक्रियांचे ऑडिओ-व्हिज्युअल सादरीकरण करत विद्यार्थ्यांशी चर्चा केली. कार्यक्रमाच्या समारोपात डॉ. वैशाली उणे यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

जागतिक प्लास्टिक सर्जरी दिवस साजरा करण्यासाठी प्लास्टिक सर्जन्स डॉ. रमाकांत बेंबडे, डॉ. मंगेश तांदळे डॉ. राम चिलगर डॉ. अनुराधा पाटील डॉ. अमित पाटील डॉ. मयूर गोकलानी डॉ. आशिष कासट डॉ. चैतन्य पाटील डॉ. तायडे डॉ. सचिन जंगले डॉ. जाकीर मोमीन डॉ. व्यंकटेश कुलकर्णी डॉ. अभिजीत गजभरे डॉ. राजा, डॉ. गुरमीत सिंग यांनी सहकार्य केले.

# भारतीय सिनेसृष्टीत नवतारकांना योग्य व्यासपीठ मिळवून देण्यासाठी स्क्रीनचा पुढाकार !

**स्क्रीनकडून स्क्रीन अकॅडमीची घोषणा !**

मुंबई, दि. १८ (प्रतिनिधी)- सिनेमाचे प्रशिक्षण देणाऱ्या नामांकित शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना अकॅडमीकडून शिष्यवृत्ती दिली जाईल. ही संस्था ना नफा तोट्यावर काम करेल. कान्स आणि ऑस्कर पुरस्कार विजेत्या गुनीत मोंगा, पायल कपाडिया, रेसुल पुकुट्टी या संस्थेचे सदस्य म्हणून काम पाहतील.

इंडियन एक्सप्रेस ग्रुप आणि स्क्रीन या प्रकाशन संस्थेने बुधवारी स्क्रीन अकॅडमीची घोषणा केली आहे. व्यावसायिक प्रगतीसाठी या अकॅडमीची उभारणी होत नसल्याचे अकॅडमीच्यावतीने स्पष्ट करण्यात आले. नवोदित कलाकारांना योग्य व्यासपीठ देणे स्क्रीन अकॅडमीचे मुख्य उद्दिष्ट आहे. संस्था भारतीय चित्रपटसृष्टीतील करिअर घडवू इच्छिणा-या नवोदित कलाकारांना त्यांचे कौशल्य विकसित करण्यात मदत करेल, त्यांना मार्गदर्शन करेल.

कान्स आणि ऑस्कर पुरस्कार विजेते गुनीत मोंगा, पायल कपाडिया, रेसुल पुकुट्टी तसेच ज्येष्ठ पटकथा लेखक अंजुम राजाबली आदी मान्यवर या स्क्रीन अकॅडमीचे सदस्य म्हणून काम पाहतील. येत्या काळात अनेक प्रतिथियश व्यक्ती या संस्थेशी जोडली जाणार आहेत. स्क्रीन अकॅडमी भारतीताल प्रमुख चित्रपट संस्थांसोबत काम करेल. या माध्यमातून भारतातील नव्या प्रतिभावान चित्रपट निर्मात्यांना जागतिक स्तरावरील चित्रपट निर्मितीचे शिक्षण देता येईल. या शिक्षणातून नवोदितांना आपली कला सादर करण्याच्या अनेक संधी निर्माण होतील. या नव्या चेह-यांची स्वतंत्र ओळख निर्माण होईल, असा विश्वास स्क्रीन अकॅडमीच्यावतीने व्यक्त करण्यात आला.

लोढा फाऊंडेशनचे संस्थापक अभिषेक लोढा यांनी या अकॅडमीच्या उभारणीसाठी आर्थिक साहाय्य केले. स्क्रीन अकॅडमी नवोदित कलाकारांना चित्रपटाशी संबंधित मूलभूत शिक्षण देईल. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाईल. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी थेट अर्ज करता येणार नाही. त्यांना यापूर्वी सिनेमाचे प्रशिक्षण देणा-या संस्थांच्यावतीने शिष्यवृत्तीसाठी शिफारस करावी लागेल. अर्जप्रक्रियेचा तपशील ु. ीलीशशपरलरवशा्.ीस या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. 'योग्य ठिकाणी आणि योग्य वेळी स्क्रीन अकॅडमीची उभारणी होत आहे, या शब्दांत राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी स्क्रीन अकॅडमीची प्रशंसा केली. मुंबई शहराचे चित्रपटसृष्टीशी अतूट नाते आहे. अगदी गरजेच्या वेळी योग्य ठिकाणी या अकॅडमीची उभारली जात आहे. द इंडियन एक्सप्रेस ग्रुपतर्फे सुरु होणी स्क्रीन अकॅडमी ही संस्था ना-नफा तत्त्वार सुरु होत असल्याचे ऐकून मला अतिशय आनंद झाला. या अकॅडमीतून शिकणारे नवोदित आणि प्रशिक्षित चित्रपटकर्मी भारतीय चित्रपटसृष्टीत मोलाचे योगदान देतील. या नव्या प्रतिभावंत कलाकारां मुळे भारतीय चित्रपटसृष्टीचा वेगाने विकास होईल, ङ्क असा विश्वास मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

इंडियन एक्सप्रेस ग्रुपचे कार्यकारी संचालक आनंद गोएंका यांनी स्क्रीन अकॅडमीच्या उभारणीमागील आपली भूमिका मांडली. ते म्हणाले, 'आम्ही स्क्रीन अकॅडमीच्या माध्यमातून मनोरंजन आणि संस्कृतीच्या क्षेत्रात उत्कृष्टतेला संस्थात्मक स्वरुप देण्याच्या दिशेने टाकलेले धाडसी पाऊल आहे. या संस्थेतून आम्ही उत्कृष्ट कलाकारांचा सन्मान करु. कलाकारांना आर्थिक मदतीसह आवश्यक संसाधनेही पुरवली जातील. लोढा फाऊंडेशनचे संस्थापक अभिषेक लोढा यांनी सांगितले, 'आपल्या देशातील कलाक्षेत्राचा विकास साधत आपण इतर देशांवर प्रभाव टाकण्याची क्षमता ठेवतो. या कामासाठी स्क्रीन अकॅडमीचे कार्य फार महत्त्वाचे आहे. यामुळे आपला देश सर्जनशील कलाक्षेत्रात जागतिक पातळीवर आघाडी घेऊ शकतो. लोढा फाऊंडेशन २०२७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्यासाठी सर्वतोपरि पाठिंबा देत आहे. चित्रपट आणि सर्जनशी कला हे आपल्या देशाची प्रमुख ताकद आहे. या दोन्ही क्षेत्रांमध्ये भारताला जागतिक पातळीवर आघाडी मिळवून देण्यासाठी स्क्रीन अकॅडमी महत्त्वाची भूमिका बजावेल. या महत्त्वकांक्षी उपक्रमात स्क्रीन अकॅडमीसोबत भागीदारी करताना लोढा फाऊंडेशनला आनंद होत आहे.

**शैक्षणिक उत्कृष्टता आणि उद्योगाचे एकत्रिकरण** – स्क्रीन अकॅडमी फेलोशिप २०२५ अंतर्गत विद्यार्थ्यांना पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी संपूर्ण आर्थिक साहाय्य दिले जाईल. हे पदव्युत्तर शिक्षण पुण्यातील फिल्म एण्ड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया, कोलकाता येथील सत्यजित रे फिल्म एण्ड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट आणि मुंबईतील व्हिललिंग वुड्स इंटरनॅशनल या संस्थांमधून पूर्ण करण्याची संधी असेल. भविष्यात देशभरात आपला विस्तार करण्याची स्क्रीन अकॅडमीची योजना आहे. यातून देशभरातील विविध चित्रपट शाळांचा अकॅडमीत समावेश करता येईल.

स्क्रीन अकॅडमीतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ तर मिळेलच शिवाय सिनेसृष्टीतील नामवंत आणि अनुभवी कलाकारांकडून मार्गदर्शन मिळेल. तज्ज्ञांकडून अकॅडमीच्या कामकाजाही पाहिले जाईल. अकॅडमीतील तज्ज्ञ विद्यार्थ्यांना चित्रपटांशी संबंधित विविध बारकावे शिकवतील, त्यांच्या मार्गदर्शनातून थेट कामकाजाशी संबंधित इंटर्नशिपच्याही संधी उपलब्ध होतील.

फिल्म एण्ड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे संचालक धीरज सिंग यांनी स्क्रीनसोबतच्या नव्या भागीदारीबद्दल आनंद व्यक्त केला. ते म्हणाले, ङ्गस्क्रीन हे सिनेमा विषयातील पत्रकारितेतील अत्यंत प्रतिष्ठित नाव आहे. स्क्रीन सोबतच्या भागीदारीतून चांगले परिणाम दिसून येतील. या शिष्यवृत्तीमुळे चांगले विद्यार्थी घडतील तसेच सिनेसृष्टीलाही नवे मूर्त स्वरुप येईल.ङ्घ

सत्यजित रे इन्स्टिट्यूटचे प्रभारी संचालक समीरन दत्ता यांनी स्क्रीन फेलोशिपचे महत्त्व पटवून दिले. ङ्गआपल्याकडे केवळ शहरातूनच नव्हे तर देशाच्या विविध कानाकोप-यांतील लोकांमध्ये उत्तम कल्पना आणि कथानकांची प्रतिभा दडलेली आहे. यापैकी काही विद्यार्थ्यांना चित्रपट निर्मिती प्रक्रियेतील शिक्षणाचा भार पेलता येत नाही. स्क्रीन अकॅडमीची फेलोशिप या विद्यार्थ्यांना सिनेमाचे तंत्रशुद्ध शिक्षण देण्यास मदत करेल.ङ्घ, असे समीरन दत्ता म्हणाले.

व्हिसलिंग वुड्स इंटरनॅशनलच्या अध्यक्षा मेघना घई पुरी म्हणाल्या, ङ्ग व्हिसलिंग वुड्स इंटरनॅशनलमध्ये दर्जेदार शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे जीवन बदलते. विद्यार्थ्यांमध्ये दडलेली सर्जनशीलता आणि महत्त्वकांक्षेत आर्थिक अडचणी उभ्या राहतात. परंतु आय.ई.स्क्रीन फाऊंडेशनच्या शिष्यवृत्तीमुळे या आर्थिक अडचणीवरही मात करता येणे शक्य झाले आहे. ही भागीदारी उत्कृष्टता, सर्वसमावेशकता आणि भविष्यातील कलाकार घडवणे या सामायिक मूल्यांवर आधारित आहे.

शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांची निवड प्रसिद्ध पटकथा लेखक आणि चित्रपटतज्ज्ञ अंजुम राजाबाली यांच्या देखरेखीखाली कार्यरत समितीकडून केली जाईल. ङ्गहा उपक्रम नवोदित तरुण कलाकारांना कला क्षेत्रातील मूलभूत शिक्षण देण्यासाठी आधार देत आहे. चित्रपटी, टीव्ही तसेच ओटीटी क्षेत्रातील प्रतिभावान कलाकारांकडून मार्गदर्शन लाभल्याने हे नवोदित कलाकार कायमच कृतज्ञ राहतील. या शब्दांत अंजुम राजाबाली यांनी शिष्यवृत्तीचे महत्त्व पटवून दिले. या शिष्यवृत्तीमुळे लेखन आणि चित्रपट निर्मितीची गुणवत्ता वाढण्यास मदत होईल. अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.

स्क्रीन अकॅडमीमध्ये सिनेसृष्टीतील नामवंत कलाकार, तज्ज्ञ मंडळी आपले अभूतपूर्व योगदान देणार आहे. या प्रतिथियश कलाकारांच्या नावांची यादी खाली नमूद करण्यात आली आहे.

– गुनीत मोंगा – ऑस्कर पुरस्कार विजेता निर्मात्या.

पायल कपाडिया – कान्स ग्रँण्ड प्रिक्स विजेत्या, कपाडिया यांना गोल्डन ग्लोब पुरस्कारासाठी नामांकनही मिळाले आहे.

रेसुल पुकुट्टी – ऑस्कर विजेते ध्वनी डिझायनर

रॉनी स्क्रूवाला – आरएसव्हीपी फिल्म्सचे संस्थापक आणि अपग्रेड या ऑनलाईन शिक्षण प्लॅटफफॉर्मचे सहसंस्थापक

सुभाष घई– ज्येष्ठ दिग्दर्शक, निर्माते आणि व्हिसलिंग वूड्स इंटरनॅशनलचे संस्थापक

स्क्रीन अकॅडमीमध्ये सहभागी सदस्यांची पूर्ण यादी लवकरच www.screenacademy.org या अधिकृत संकेतस्थळावर दिली जाईल.

**उत्कृष्टतेचा नवा आयाम –**

येत्या काळात स्क्रीन अकॅडमी स्क्रीन पुरस्कारांचेही आयोजन करेल. या पुरस्कारांमध्ये चित्रपटसृष्टीतील कलात्मक सर्जनशीलता, सांस्कृतिक गुणवत्ता आणि तांत्रिक नवकल्पनांचा गौरव केला जाईल. या पुरस्कार निवडीसाठी अकॅडमीच्या सदस्यांची मतदान प्रक्रिया राबवली जाईल. या मतदानातून पुरस्कार निवडीचा अंतिम निर्णय घेताना विश्वासार्हता आणि अनुभव संपन्नता जपली जाईल.

स्क्रीन अकॅडमीची उत्कृष्ट गुणवत्ता सांभाळण्याची जबाबदारी पेलण्यासाठी रेसिडेंट क्रिटिक्स पॅनलची स्थापना करण्यात आली आहे. यात लॉस एंजेलिस येथील युनिव्हर्सिटी ऑफ सदर्न कॅलिफोर्नियामधील सिनेमा आणि मिडीया स्टडीज विभागातील सिनेमॅटिक आर्ट्सच्या प्राध्यापिका डॉ. प्रिया जयकुमार, स्क्रीन पुरस्कारांच्या आयोजिका प्रियांका सिन्हा झा, द इंडियन एक्सप्रेसच्या चित्रपट समीक्षिका शुभ्रा गुप्ता, वी आर युवा या डिजीटल प्लॅटफफॉर्मचे निखिल तनेजा, प्रसिद्ध पटकथा लेखक आणि व्हिसलिंग वूड्स इंटरनॅशनल तसेच एफटीआयआयमधील पटकथा लेखन विभागाचे प्रमुख अंजुम राजाबाली यांचा या रेसिडेंट क्रिटिक्स पॅनलमध्ये समावेश करण्यात आला आहे. स्क्रीन अकॅडमीच्या स्क्रीन पुरस्कारांच्या आयोजिका प्रियांका सिन्हा झा यांनीही आपले मत मांडले. त्या म्हणाल्या, 'स्क्रीन अकॅडमी भविष्यात चित्रपट, संगीत, रंगभूमी, प्रादेशिक चित्रपट आणि इतर संबंधित कला प्रकारांमधील उत्कृष्ट योगदानाचा सन्मान करण्यासाठी प्रयत्नशील आहे. यातील पारदर्शकता, न्याय आणि विश्वासार्हता निश्चित करण्यासाठी योग्य वर्गवारी, आवश्यक निकष तसेच मूल्यांकन या घटकांवर आधारित प्रणाली तयार केली जाईल.

# गणपती बाप्पाः सरकार मोरया! महाराष्ट्र शासन थेट गणेशोत्सवात उतरणार, मंत्री आशिष शेलारांची घोषणा

मुंबई, दि. १९ (प्रतिनिधी) – शंभर वर्षाहून मोठी परंपरा असलेला महाराष्ट्रातील गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा देण्यात आला असून महाराष्ट्रातील गणेशोत्सवात यावर्षी पासून शासन थेट सहभागी होऊन हा महोत्स्व राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहचवण्यासाठी तसेच राज्यात गणेशोत्सवात होणाऱ्या विविध कार्यक्रमांची रुपरेषा आज सांस्कृतीक कार्य मंत्री ॲड आशषि शेलार यांनी विधानसभेत जाहीर केली.

विधानसभेत सांस्कृतीक कार्यमंत्री ॲड आशषि शेलार यांनी जाहीर केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र ही कला, संस्कृती व परंपरेची समृद्द भूमी आहे.

संत-सुधारकांचा, थोरांचा-विरांचा,भक्तीचा-अध्यात्माचा आणि सर्वसमावेशकतेचा वारसा या भूमीला लाभलेला आहे.

दख्खनची ही पवित्र माती वैचारिक प्रकल्गभतेने ओतप्रेत भारलेली असून, राज्याच्या आर्थिक/ सामाजिक, सांस्कृतिक प्रगतीचा पाया सामाजिक एकरुपतेने घातलेला आहे.

ही एकरूपता निर्माण होण्यासाठी गणेशोत्सवाने मोलाची भूमिका पार पडलेली आहे. शेकडो वर्षाची घरगुती गणेशोत्सव परंपरा व अनेक वर्षापासूनची सार्वजनिक गणेशोत्सव परंपरा म्हणजे महाराष्ट्राच्या संस्कृतिक व सामाजिक समरसतेचे मानबिंदूच आहेत.

याच मानबिंदूच महत्त्व व ओळख संपूर्ण जगभर व्हावी, आपल्या परंपरेची आधुनिकतेशी सांगड व्हावी सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या महत्वाचे असणारे गणेशोत्सव हे व्यासपीठ आणखी मजबूत व्हावे, गणेशोत्सवासंबंधी सर्व घटक एकत्र जोडले जावेत, पर्यटन वाढावे, आपल्या समृद्ध परंपरा रितीरिवाजांचे जतन-संवर्धन व्हावे आणि महाराष्ट्राचे स्थान जगाच्या नकाशावर आधारित व्हावे यासाठी गणेशोत्सव हा राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्याचे महाराष्ट्र शासनाने ठरवले आहे.

गणेशोत्सवाचे परंपरागत स्वरूप कायम ठेवून त्यास आधुनिकतेची जोड देण्यासाठी आणि राज्याचा प्रत्येक नागरिक प्रत्यक्ष- अप्रत्यक्षरित्या या महोत्सवाशी जोडला जाण्यासाठी राज्य महोत्सव होणे आवश्यक आहे. यासाठी महाराष्ट्र शासन सुलभकर्ता म्हणून महत्त्वाची भूमिका बजावेल.

# २० जुलैला छत्रपती संभाजीनगर येथे मंदिर-संस्कृतीच्या रक्षणार्थ 'महाराष्ट्र मंदिर न्यास परिषद'!

छत्रपती संभाजीनगर, दि. १९ (प्रतिनिधी) – मंदिरे ही हिंदु धर्माची आधारशीला आहेत. त्यातून मिळर्णाया ईश्वरी चैतन्यामुळेच आधुनिक काळातही समाज मंदिरांकडे आकर्षित होतो. त्यामुळे मंदिरांतील पावित्र्याचे रक्षण करणे, हे हिंदु समाजाचे दायित्व आहे. मंदिरातील देवतातत्त्व टिकवण्यासाठी मंदिरांत विधीवत पूजा-अर्चा करणे, प्राचीन मंदिर-संस्कृतीचे संवर्धन करणे, मंदिरांच्या समस्यांचे निवारण करणे, मंदिरात येर्णाया भाविकांसाठी सुविधा उपलब्ध करून देणे, दर्शनरांगांचे सुनियोजन करणे, तसेच मंदिर परंपरांचे रक्षण करणे यांसाठी मंदिरांचे विश्वस्त, पुजारी, भक्त आदींचे संघटन आवश्यक आहे. त्यासाठी श्री काशी विश्वनाथ बाबा संस्थान, दत्त मंदिर, बीड बायपास, श्री पावन गणेश मंदिर, दिवाण, देवडी, सोमठाणा येथील श्री रेणुकामाता मंदिर, हिंदु जनजागृती समिती आणि महाराष्ट्र मंदिर महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने श्री काशी विश्वनाथ देवस्थान, दत्त मंदिर, बीड बायपास, देवळाई चौक येथे २० जुलै या दिवशी सकाळी ९ ते सायंकाळी ५.३० या वेळेत 'महाराष्ट्र मंदिर न्यास परिषदे'चे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेला छत्रपती संभाजीनगर, जालना, नांदेड, परभणी या जिल्ह्यातील २०० हून अधिक मंदिराचे विश्वस्त, प्रतिनिधी, पुरोहित, मंदिरांच्या रक्षणासाठी लढा देणारे अधिवक्ते, अभ्यासक आदी सहभागी होणार आहेत, अशी माहिती मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक श्री. सुनील घनवट यांनी दिली आहे. या परिषदेला माजी धर्मादाय आयुक्त श्री दिलीप देशमुख, सनातनचे धर्मप्रचारक सद्गुरु नंदकुमार जाधव, श्री १००८ महामंडलेश्वर योगेशानंद गिरीजी महाराज या सर्वांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

या परिषदेमध्ये प्रामुख्याने श्री घृष्णेश्वर मंदिर संस्थान ट्रस्ट, श्री भद्रा मारुती मंदिर, श्री संस्थान गणपती, राजा बाजार, श्री सुपारी हनुमान मंदिर, गुलमंडी, श्री संत एकनाथ महाराज मंदिर, पैठण, श्री गणपती मंदिर, राजूर या मंदिरांचे विश्वस्त सहभागी होणार आहेत. या मंदिर परिषदेत मान्यवरांचे मार्गदर्शन, मंदिरांशी निगडीत विविध विषयांवर चर्चासत्रे होणार आहेत. यामध्ये 'मंदिरे सनातन धर्मप्रचाराची केंद्रे बनवणे', 'मंदिरे सरकारीकरण मुक्त करणे', 'वक्फ कायद्या'द्वारे मंदिरांच्या भूमीवर अतिक्रमण आणि मंदिरे बळकावणे यांवर उपाय, मंदिरे आणि तीर्थक्षेत्रे यांच्या परिसरात मद्य-मांस बंदी; दुर्लक्षित मंदिरांचा जीर्णोद्धार आदी विषयांवर चर्चा होणार आहे. ही परिषद केवळ निमंत्रितांसाठी असून यामध्ये सहभागी होण्यासाठी ८२०८४४३४०१ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मंदिर महासंघाने केले आहे.

# मराठा तरुणांना आदिवासी प्रमाणपत्र वाटप! विभाग उपायुक्तावर निलंबनाची कारवाई

**बोगस प्रमाणपत्रांसंदर्भात आदिवासी विकास भवनात उपायुक्तांवर थेट निलंबनाची कारवाई**

मुंबई, दि. (प्रतिनिधी) – पावसाळी अधिवेशनात अनेक आमदारांकडून प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या कामकाचा ढिगाळ आणि गलथानपणा समोर आणून त्यांच्यावर कारवाईची मागणी केली जात आहे. लक्षवेधीद्वारे सभागृहात हा भोंगळपणा समोर आणला जात आहे. गेल्या काही दिवसात अनेक अधिकाऱ्यांचे निलंबन करण्यात आले. त्यात आज पुन्हा एका बड्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात आली आहे. ते म्हणजे आदिवासी विभागातील उपायुक्त संगीता चव्हाण यांचे.

आदिवासी विभागातील उपायुक्त संगीता चव्हाण यांचे निलंबन संगीता चव्हाण यांनी मराठा समाजातील तरुणांना आदिवासी प्रमाणपत्र दिले होते, त्यामुळे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी त्यांच्यावर निलंबनाची ) कारवाई केली असून याबाबत अधिवेशनात घोषणा देखील करण्यात आली. अशोक उईके यांनी आदिवासी विभागातील उपायुक्तांवर निलंबनाची कारवाई करत प्रशासकीय अधिकाऱ्यांना एकप्रकारे इशाराच दिला आहे. दरम्यान, आपल्यावर निलंबनाची कारवाई झाली, याची अद्याप वरिष्ठांकडून माहिती नसल्याचं संगीता चव्हाण यांनी स्पष्ट केलं.

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर सध्या अँक्शन मोडवर आहेत. काही दिवसांपूर्वी दिव्यांग आयुक्तांचे थेट विधानसभेतून निलंबन केले होते. आमदारांचां फोन न उचलणे, तसेच एका शिक्षण संस्थेबाबत सातत्याने तक्रारी असूनही कारवाई न केल्याने त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आली होती.

त्यानंतर आज जितेंद्र आव्हाड आणि गोपीचंद पडळकर यांच्या समर्थकांच्या वादावरूनही मोठा निकाल दिला होता.

# केंद्रीय आरोग्य सेवा योजनेच्या दरांमध्ये सुधारणा करणार - केंद्रीय मंत्री मनसुख मांडविया

मुंबई, दि. १९ (प्रतिनिधी)– केंद्रीय आरोग्य सेवा योजनेच्या दरांमध्ये सुधारणा करण्याची बाब केंद्र सरकारच्या विचाराधीन असून लवकरच त्यात सुधारणा केली जाईल, अशी ग्वाही केंद्रीय श्रम व रोजगार मंत्री मनसुख मांडविया यांनी दिली. राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी बुधवारी नवी दिल्ली येथे केंद्रीय श्रम व रोजगार मंत्री श्री. मांडविया यांची वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळासह भेट घेतली.

या भेटीत महाराष्ट्रातील राज्य कामगार विमा योजना रुग्णालयांच्या सद्यस्थितीबाबत सविस्तर चर्चा झाली. राज्यातील कामगार रुग्णालयामध्ये दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याचे शासनाचे धोरण असुन राज्यातील कामगार रुग्णालयासंबंधीत प्रलंबित प्रश्नांची तातडीने सोडवणूक व्हावी, अशी मागणी आरोग्यमंत्री श्री.आबिटकरांनी यावेळी केली.

राज्यात कामगार विमा सोसायटीची पंधरा रुग्णालये असुन योजनेची संलग्नित असलेल्या ४५० खाजगी रुग्णालये व १३४ सेवा दवाखान्याच्या माध्यमातून कामगार व सर्वसामान्य नागरिकांसाठी आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली जाते.

राज्यात सद्यस्थितीत ४८ लाख ७० हजार ४६० विमाधारक कामगार असुन, कामगार व त्यांचे कुटुंबीय मिळून सुमारे दोन कोटी नागरिक विमा योजनेचा लाभ घेतात. केंद्रीय श्रम व रोजगार मंत्री यांच्या भेटीत उल्हासनगर, अंधेरी, कोल्हापूर येथील बांधकामांची सद्यस्थिती, विविध ठिकाणी सुरू असलेल्या रुग्णसेवा बाबतची चर्चा झाली.

कामगार व त्यांचे कुटूंबियांना गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा देण्यासाठी राज्याला अधिक निधी देण्याची विनंती आरोग्य मंत्री श्री. आबिटकर यांनी केली. सद्यस्थितीत २१,००० हजार रुपये मासिक उत्पन्न असलेल्या कामगारांना विमा योजनेचा लाभ घेता येतो. ही उत्पन्न मर्यादा ३०,०००हजार रुपये पर्यंत वाढवण्याची मागणी यावेळी केली. उत्पन्नाची मर्यादा वाढवल्यास विमाधारक कर्मचाऱ्यांची संख्याही वाढेल तसेच अनेक कामगारांना या योजनेचा लाभ घेता येईल, असेही मंत्री श्री.आबिटकर यांनी केंद्रीय मंत्र्यांना सांगितले.

केंद्रीय मंत्री श्री. मांडविया यांनी वरील सर्व प्रश्नांच्या सोडवणुकी बाबतीत सकारात्मक चर्चा केली. तसेच राज्याचे आरोग्य मंत्री यांचे समवेत मुंबईतील अंधेरी येथील ईएसआयएस (ESIS) रुग्णालयास संयुक्त भेट देऊन पाहणी करणार असल्याचे सांगितले आहे.

राज्यातील सर्व ईएसआयसी रुग्णालयांबाबत एक सविस्तर आढावा बैठक आयोजित करण्याच्या सूचनाही केंद्रीय मंत्र्यांनी यावेळी दिल्या.

अंधेरी, कोल्हापूर आणि उल्हासनगर येथील ईएसआयसी रुग्णालयांची प्रलंबित कामे लवकरात लवकर पूर्ण करून ती कार्यान्वित करण्यासाठी ईएसआयसी महासंचालकांना सूचना देण्यात येतील, तसेच कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक येथील ईएसआयसी रुग्णालयाची श्रेणीवाढ करण्याबाबतही विचार केला जाईल, असे डॉ.मांडविया यांनी सांगितले.

या भेटीमुळे महाराष्ट्रातील ईएसआयसी एडखउ आरोग्य सुविधांच्या सक्षमीकरणाला गती मिळेल आणि विमाधारक कर्मचाऱ्यांसाठी उत्तम आरोग्य सेवा उपलब्ध होतील, असे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी या भेटीबाबत सांगितले. या भेटीच्या वेळी आरोग्य सचिव श्री.वीरेंद्र सिंग, एडखउ चे आयुक्त श्री.रमेश चव्हाण व इतर अधिकारी उपस्थित होते.

# महाराष्ट्रातील आणखी एका शहराचे नाव बदललं; सांगलीतील इस्लामपूर आता ईश्वरपूर!

सांगली, दि. १९ (प्रतिनिधी) – सांगली जिल्ह्यातल्या इस्लामपूर या गावाचे नाव बदलण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. देवेंद्र फडणवीस सरकारमधील मंत्री छगन भुजबळ यांनी विधीमंडळ अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी ही माहिती दिली. सरकारच्या या निर्णयामुळे आता इस्लामपूरचे नाव ईश्वरपूर झाले आहे.

राज्य सरकारनं याबाबतचा निर्णय घेतला असून याबाबतचा प्रस्ताव केंद्र सरकारकडं मंजुरीसाठी पाठवण्यात आला आहे, असं भुजबळ यांनी स्पष्ट केलं. इस्लामपूरचे नाव ईश्वरपूर करावे ही हिंदुत्ववादी संघटना तसंच त्या शहरातील नागरिकांची सातत्यानं मागणी होती. ती मागणी सरकारनं मान्य केली आहे. राज्यात गेल्या काही वर्षांमध्ये शहराचं नाव बदलण्याची ही पहिलीच घटना नाही. यापूर्वी औरंगाबादचं नाव बदलून छत्रपती संभाजीनगर असे ठेवण्यात आले. तसंच उस्मानबादचे नाव धाराशिव आणि अहमदनगरचे नाव अहिल्यानगर ठेवण्यात आले आहे. त्यानंतर आता सांगली जिल्ह्यातील इस्लामपूरचं नावसुद्धा बदलण्यात आलं आहे. या बदलाचे स्वागत आमदार सदाभाऊ खोत यांनी केलं आहे. सदाभाऊ खोत म्हणाले की इस्लामपूरचे ईश्वरपूर नाव करण्यात यावे अशी माहिती मागणी आम्ही केली होती. वाळवा तालुक्यातील नागरिकांनी सुद्धा मागणी नाव बदलण्यासंदर्भात केली होती. त्यामुळे ईश्वरपूरच्या लोकांचे मी अभिनंदन करतो, असे सदाभाऊ खोत यांनी सांगितले.

# पनवेलमध्ये सापडले तब्बल ३५ कोटींचे ड्रग्ज! एका नायजेरियन महिलेला अटक

पनवेल: नवी मुंबईतील पनवेल रेल्वे स्टेशन सारख्या गजबजलेल्या ठिकाणांहून तब्बल ३५ कोटींच्या ड्रग्जचा माल सापडल्यानं खळबळ उडाली आहे. पनवेल रेल्वे स्टेशनवर बेंगळुरुमधील नारकोटिक्स नियंत्रण विभागाने (NCB) केलेल्या संयुक्त कारवाईत तब्बल ३५ कोटी रुपयांचे तब्बल साडेतीन किलो 'मेथ' ड्रग्ज जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणी एका नायजेरियन महिलेला अटक करण्यात आली असून, पुढील तपास रेल्वे पोलीस आणि NCB एकत्रितपणे करत आहेत. ही कारवाई विशेषतः रेल्वे मार्गांचा गैरवापर करून ड्रग्ज वाहतूक करणाऱ्या टोळ्यांविरुद्ध एक मोठा झटका मानला जात आहे.

NCB व रेल्वे पोलीस या संपूर्ण प्रकरणाचा सखोल तपास करत असून, या नायजेरियन महिलेमार्फत कोणत्या टोळीशी संपर्क आहे, ही ड्रग्ज कुठून आणली गेली आणि कुठे पोहोचवायची होती, याचा शोध घेतला जात आहे.

# महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी 'हरित वीज क्रांती': मुख्यमंत्र्यांची मोठी घोषणा, १० हजार कोटींची बचत!

मुंबई, दि. १९ (प्रतिनिधी) – महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेतील अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलताना एक महत्त्वपूर्ण घोषणा केली आहे. लवकरच महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरेल, जे शेतकऱ्यांना हरित (ग्रीन) वीज पुरवेल. या निर्णयामुळे राज्याच्या शाश्वत विकासाला गती मिळेल आणि वीज खरेदीत १० हजार कोटी रुपयांची बचत होईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

फडणवीस म्हणाले की, राज्याच्या शाश्वत विकासासाठी एक सविस्तर 'ब्लू प्रिंट' तयार करण्यात आली आहे. सध्या राज्याची ५० टक्के वीज हरित ऊर्जा स्रोतांच्या माध्यमातून तयार केली जात आहे. पुढील पाच वर्षांत विजेचे दर कमी होतील, असे आश्वासनही त्यांनी दिले. यापूर्वी दरवर्षी ९.२० टक्क्यांनी विजेचे दर वाढत होते, परंतु आता दरवर्षी ते कमी होतील असे मुख्यमंत्री म्हणाले. या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत, राज्यातील सुमारे ३० लाख कुटुंबांना विजेचे बिल येणार नाही, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. घरगुती वीज वापरणाऱ्या ग्राहकांना सौर मुक्ती दिली जाईल. तसेच, शेतकऱ्यांसाठी साडेसात अश्वशक्ती (7.5 HP) ऊर्जा वापरण्याचा निर्णय कायम ठेवला असून, यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात वीज उपलब्ध होईल. या घोषणांमुळे राज्यातील शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिक दोघांनाही मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. हरित ऊर्जेच्या वापरामुळे पर्यावरणावर सकारात्मक परिणाम होईल, तर वीज दरात कपात आणि मोफत वीज योजनेमुळे आर्थिक भार हलका होईल.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक

लोकविजय

(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)

हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.

**: संपादक :**

**राजेंद्र पांडुरंग रांजणीकर**

मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५

e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, पूकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.

(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# दोन उपकेंद्रांतील पॉवर ट्रान्सफॉर्मरची क्षमतावाढ, ग्राहकांना मिळणार अखंडित व दर्जेदार वीजपुरवठा

छत्रपती संभाजीनगर दि.१९ (प्रतिनिधी)- महावितरणने छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील दोन उपकेंद्रांची क्षमतावाढ केली आहे. त्यामुळे ग्राहकांना अखंडित व दर्जेदार वीजपुरवठा मिळणार आहे. शहरातील बेडसे उपकेंद्र व जालना जिल्ह्यातील नळणी या उपकेंद्रांचा यात समावेश आहे.

चिकलठाणा एमआयडीसीतील बेडसे उपकेंद्रात आधी ५ एमव्हीए क्षमतेचे दोन पॉवर ट्रान्सफॉर्मर होते. उपकेंद्रातून परिसरातील ४ हजार १४० ग्राहकांना वीजपुरवठा करण्यात येतो. मात्र दिवसेंदिवस वाढणारी ग्राहकांची संख्या व विजेच्या मागणीमुळे सुरळीत वीजपुरवठा करण्यात अडथळा निर्माण होत होता. यावर उपाय म्हणून महावितरणने उपकेंद्रातील एका ५ एमव्हीएच्या पॉवर ट्रान्सफॉर्मरची क्षमतावाढ करून तो १० एमव्हीए करण्याचा निर्णय घेतला. आता उपकेंद्रातील दोन्ही पॉवर ट्रान्सफॉर्मरची एकत्रित क्षमता १५ एमव्हीए झाल्याने ग्राहकांना अखंडित व दर्जेदार वीजपुरवठा मिळणार आहे. यात उत्तरानगरी, ब्रिजवाडी, नारेगाव, मसनतपूर, चिकलठाणा एमआयडीसी आदी वसाहतीतील ग्राहकांना प्रामुख्याने याचा लाभ होणार आहे.

मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांच्या हस्ते शुक्रवारी (१८ जुलै) ट्रान्सफॉर्मर कार्यान्वित करण्यात आला. यावेळी अधीक्षक अभियंता मनीष ठाकरे, महेश पवार, बीना सावंत, कार्यकारी अभियंता महेंद्र देशमुख, अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रशांत नाखले यांच्यासह अभियंते, कर्मचारी उपस्थित होते.



जालना जिल्ह्यातील नळणी (ता.भोकरदन) येथील उपकेंद्रात आधी ५ एमव्हीए क्षमतेचा पॉवर ट्रान्सफॉर्मर होता. उपकेंद्रातून परिसरातील २ हजार ८७९ ग्राहकांना वीजपुरवठा करण्यात येतो. मात्र वाढणारी ग्राहकांची संख्या व विजेच्या मागणीमुळे सुरळीत वीजपुरवठा करण्यात अडथळा निर्माण होत होता. यावर उपाय म्हणून महावितरणने उपकेंद्रातील ५ एमव्हीएच्या पॉवर ट्रान्सफॉर्मरची क्षमतावाढ करून तो १० एमव्हीए करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे ग्राहकांना अखंडित व दर्जेदार वीजपुरवठा मिळणार आहे. नळणी बु., नळणी खु., नळणी वाडी, बरंजळा साबळे, खापरखेडा, तडेगाव, तडेगाव वाडी, तोंडुळी, बाणेगाव, थिगळखेडा, गव्हाण, संगमेश्वर या गावांतील ग्राहकांना प्रामुख्याने याचा लाभ होणार आहे. उपकार्यकारी अभियंता शरद चेचर व अभियंते, कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत गुरुवारी (१७ जुलै) पॉवर ट्रान्सफॉर्मर कार्यान्वित करण्यात आला.

## सामाजिक उत्तरदायित्व निधीतून टोयोटा उभारणार बिडकीन येथे शाळा



छत्रपती संभाजीनगर दि.१८ (प्रतिनिधी)- टोयोटा कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून बिडकीन येथे शाळा उभारणीचे काम करण्यात येणार असून तत्संबंधी अधिक तपशिल महिना अखेर होणाऱ्या सामंजस्य कराराच्या वेळी स्पष्ट केला जाईल.

यासंदर्भात आज टोयोटा संस्थेचे जनरल मॅनेजर रवी सोनटक्के व प्रोजेक्ट जनरल मॅनेजर जगदीश पी.एस. यांनी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांची भेट घेतली. अपर जिल्हाधिकारी संभाजी अडकुणे, उपजिल्हाधिकारी सामान्य शाखा संगिता राठोड यांची यावेळी उपस्थिती होती.

झालेल्या चर्चेनुसार, टोयोटाची प्रकल्प उभारणी होत असून लवकरच आपल्या उद्योग क्षेत्रात कंपनीच्या ध्येय्यधोरणानुसार सामाजिक उत्तरदायित्व निधीतून सामाजिक हिताचे प्रकल्प राबविण्यात येणार आहेत. त्यात बिडकीन येथे शाळा उभारणीचे काम ही संस्था करणार आहे. अत्याधुनिक शाळेची उभारणी यानिधीतून कंपनी करुन देणार आहे. त्यासाठी या महिनाअखेर जिल्हा प्रशासनाशी सामंजस्य करारही केला जाणार आहे. त्यावेळी अधिक तपशिल देण्यात येईल,असे सोनटक्के यांनी सांगितले.

## रोटरी क्लब ऑफ औरंगाबाद तर्फे सिद्धार्थ इंटरनॅशनल स्कूल येथे दंत तपासणी शिबिर




छत्रपती संभाजीनगर दि.१९ (प्रतिनिधी)- रोटरी क्लब ऑफ औरंगाबाद तर्फे सिद्धार्थ इंटरनॅशनल स्कूल येथे विद्यार्थ्यांसाठी दंत तपासणी शिबिर नुकतेच घेण्यात आले. सुमारे ७० विद्यार्थ्यांच्या दातांची तपासणी करण्यात आली. त्यांना दातांची काळजी कशी घ्यायची याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. या शिबिरासाठी डॉ माधुरी पारगावकर, डॉ प्रसन्न डहाके, शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता निकाळजे तसेच हेल्दी स्माईल फाऊंडेशन च्या रचना देशपांडे यांचे सहकार्य लाभले. रोटरी क्लब तर्फे अध्यक्ष श्री अनय फणसळकर, सचिव श्री मुकुंद पागे, श्री श्रीपाद कुलकर्णी, श्री सुनील बागुल, श्री शैलेश तुळापूरकर हे शिबिरास उपस्थित होते.

## भगवान परमात्मा नामस्मरणाने सर्व पापांचे क्षालन होते-हभप ज्ञानेश्वर महाराज मधाने

वैजापूर दि.२० (प्रतिनिधी)- समाजातील ज्या व्यक्तीकडून काही चुका किंवा अधर्म कार्य झालेले असेल तर त्या व्यक्तीने भगवान परमात्मा नामस्मरण केल्यास व अशी अधर्म कार्य पुन्हा करणार नाही अशी क्षमा याचना केल्यास त्याच्या जीवनातील सर्व पापांचे क्षालन होते, असे अमृत वचन शुक्रवार (ता.१८) रोजी हभप ज्ञानेश्वर महाराज मधाने यांनी केले.

ते संत शिरोमणी सावता महाराज यांच्या ७२९व्या पुण्यतिथी निमित्त व संत नामदेव महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त




आयोजित अखंड हरिनाम सप्ताह निमित्त आयोजित कीर्तन सोहळ्यात माळी गल्ली येथील संत शिरोमणी मंदीर समोरील कार्यक्रमात कीर्तन करीत होते.

ते पुढे म्हणाले की, संत शिरोमणी सावता महाराज यांना शेतीचे कष्ट करीत असताना, त्या काबाड कष्टत देवाचे दर्शन झाले,त्यांची पांडुरंग भक्ती अगाध आहे.या प्रसंगी महिला वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होता. संत सावता मंदीर आनंदनगर व संत सावता महाराज मंदिर माळी गल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने या दोन्ही मंदिरात काकडा आरती, हरिपाठ, श्रीमद भागवत कथा,कीर्तन असे कार्यक्रम चालू आहेत.या प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत,नगरसेविका शोभाबाई भुजबळ,सुमनबाई गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. आयोजक सजनराव गायकवाड,गौतम गायकवाड, रतीलाल गायकवाड व समिती सदस्य ज्ञानेश्वर पवार,सीता मावशी गायकवाड, जिजाबाई गायकवाड, सुमन आंबेकर,सत्यभामा बनकर, फकिरा गायकवाड सहभाग नोंदवीत आहेत.

## कीर्तनं, प्रवचनं ही केवळ ऐकण्यासाठी नाही तर अनुभवण्याठी असतात-ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड

जालना दि.१९ (प्रतिनिधी)- श्री ज्ञानेश्वरी, गीता, गाथा आदी संत साहित्याच्या आधारे होणारी कीर्तन, प्रवचने ही केवळ ऐकण्यासाठी नसतात तर ती प्रत्यक्षात अनुभवण्याठी असतात. याची अनुभूती म्हणजे सदमार्गावर चालणे होय. यासाठी या माध्यमांचा केवळ ऐकण्यापुरता उपयोग न करता यांचा प्रत्यक्ष अनुभव घ्यायला हवा. यामुळे जीवनातील आनंद वाढेल असे प्रतिपादन ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड यांनी केले. सारवाडी येथील गावकरी या वर्षी मोठया संख्येने डॉ. भगवान बाबांच्या पायी वारीत सहभागी झाले होते. या वारकऱ्यांनी ह. भ. प. दामोधर अण्णा काळे यांच्या मार्गदर्शनाखाली गावात मोठा मावंदयाचा कार्यक्रम ठेवला होता. याप्रसंगी डॉ. फड यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले होते. श्री ज्ञानेश्वरी व



गीतेची महती या कीर्तनातून फड यांनी संदर्भासह सांगीतली. श्री ज्ञानेश्वर माऊली व त्यांची ग्रंथसंपदा ही केवळ वाचण्याचा, ऐकण्याचा किंवा सांगण्याचा विषय नसून ते खऱ्या अर्थाने प्रत्यक्ष अनुभवण्याचा विषय आहेत, असे म्हटले. ज्याला ज्ञानदेवांनी केलेल्या कार्याची व त्यांच्या श्री ज्ञानेश्वरी, चांगदेव पासष्टी, स्फुट अभंग आणि हरिपाठाची अनुभूती घेता येईल, त्याच्या जीवनात चिंता, तणाव, वाद, अहंकार, काम, क्रोध, नकारात्मक दृष्टी या विकारांना स्थान असणार नाही. श्री ज्ञानेश्वरी वाचणे म्हणजे आपोआप गीता वाचणे होय. कारण श्री ज्ञानेश्वरी ही गीतेवरील टिकात्मक परीक्षण होय. कीर्तन, प्रवचनातून संत तुकाराम, संत नामदेव आदी संतांचे साहित्य सांगीतले जात असल्याने त्याची अनुभूती घेण्याची मानसिकता असावी. अशा अनुभूती घेणाऱ्या व्यक्तीचे जीवन सुख, समाधान, शांती, समृध्दी, सकारात्मक दृष्टी व आनंदयुक्त असेल असे फड म्हणाले. कार्यक्रमानंतर उपस्थित सर्व भाविकांना महाप्रसादाचा लाभ देण्यात आला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पंडीतराव काळे, श्री ज्ञानेश्वरी व्यासपीठ वाचक नारायणराव काळे, गणेश बापू काळे, मदन काळे, प्रल्हाद काळे, कौशल्या काळे, उध्दव काळे, गोदावरी चौधरी, पारस काळे, नारायण महाराज काळे आदींनी पुढाकार घेतला होता.

## पँथर्स रिपब्लिकन पार्टीतर्फे सोमवारी क्रांती चौकात आंदोलन

छत्रपती संभाजीनगर दि.१९ (प्रतिनिधी)- पँथर्स रिपब्लिकन पार्टी ची महत्वपूर्ण बैठक पक्ष अध्यक्षा सूर्यकांता गाडे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या बैठकीमध्ये महत्त्वपूर्ण विषयावर चर्चा होऊन क्रांती चौक या ठिकाणी विविध मागण्यासाठी पक्षाच्यावतीने सोमवारी दिनांक २१ जुलै रोजी आंदोलन करण्यात येणार आहे. पुढील मागण्यासाठी हे आंदोलन करण्यात येणार आहे. जन सुरक्षा विधेयक रद्द करण्यात यावे, अतिक्रमणात पाडण्यात आलेल्या बाधित गोरगरीब लोकांना मोबदला देऊन त्यांच्या घरांचे पुनर्वसन करण्यात यावे, येणाऱ्या महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, निवडणुकीमध्ये ईव्हीएम मशीन द्वारे मतदान न घेता बॅलेट पेपरवर घेणे, सरकारी गायरान जमिनीवर बसलेल्या अतिक्रमित झोपड पट्ट्यांना मालकी हक्काचे उतारे देण्यात यावेत, कसत असलेल्या गायरान जमिनी कसणाऱ्यांच्या नावे करण्यात याव्यात, बौद्धगया येथील महाबोधी विहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे आदि मागण्यासाठी क्रांती चौक येथे पक्षाच्यावतीने सोमवारी दुपारी ठीक १२.०० वाजता तीव्र स्वरूपाचे निदर्शने करण्यात येणार आहेत. तशा सूचना बैठकी मधील उपस्थित कार्यकर्त्यांना देण्यात आल्या आहेत व उर्वरित कार्यकर्त्यांना व समाज बांधवांना या मेसेज द्वारे कळविण्यात येते की दिवसेंदिवस होत असलेल्या गोर गरिबांवर अन्याय अत्याचाराच्या विरोधात आवाज उठवण्यासाठी राज्य सरकारने पारित केलेल्या जन सुरक्षा विधेयका विरोधात तीव्र स्वरूपाची निदर्शने करण्याचे निश्चित केले आहे. तरी सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते महिला आघाडी कामगार वर्ग व समाज बांधव यांनी याची दक्षता घेऊन मोठ्या प्रमाणात मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपला आवाज बुलंद करावा असे पक्षाच्या वतीने आव्हान करण्यात येत आहे.

## मुनिश्री प्रभाव सागर महाराज यांच्या उपस्थितीत चातुर्मास कलश स्थापना आयोजन

छत्रपती संभाजीनगर दि.१९ (पतिनिधी)- श्री १००८ कलिकुंड पार्श्वनाथ सैतवाळ दिगंबर जैन मंदिर एन ९अहिंसा मार्ग सिडको येथे आचार्य पवित्र सागर महाराजांचे परम प्रभावक शिष्य मुनिश्री प्रभाव सागरजी महाराज यांचा चातुर्मास होत आहे चातुर्मास कलश स्थापना दिनांक २०/७/२०२५ रविवार रोजी प्रतीष्ठाचार्य राजेश रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येणार आहे या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माननीय श्री जितेंद्रजी पापळकर विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर प्रमुख अतिथी मा.नामदार श्री अतुल जी सावे,मा. आमदार संजयजी केणेकर, मा.श्रीफुलचंदजी जैन उद्योजक रवी मसाले यांची उपस्थिती राहणार आहे तसेच श्री रविंद्रजी नारळे, श्री नितेशजी भंडारे, श्री रविंद्रजी कोंडेकर, श्री सुकुमारजी समजगे,श्री अमितजी गुंगे, श्री राजेन्द्रजी अवतारे, श्री संतोषजी सोनटक्के, श्री नितीनजी चित्ते यांच्या उपस्थितीत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे सकाळी ठिक १०-३० वाजता या कार्यक्रमाला सुरुवात होणार आहे या साठी विविध ठिकाणच्या गुरू भक्ताची उपस्थिती राहणार आहे परम पुज्य मुनिश्री प्रभावसागर जी महाराज यांचे चातुर्मास निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असुन चातुर्मास समिती अध्यक्ष म्हणून श्री अमोल मोगले कार्याध्यक्ष म्हणून श्री अजित गोसावी यांची नियुक्ती करण्यात आली आहे तसेच विश्वस्त श्री वर्धमान जी वायकोस,प्रकाश भाकरे,दिपक डिकेकर, निलेश सावळकर,रविंद्र सांगोले,शेखर वायकोस,बाहुबली धोंगडे, राजकुमार कुरकुटे यांच्यावर विशेष जबाबदारी देण्यात आली आहे त्यासह विविध समीत्यावर सौ पल्लवी वायकोस सौ.अर्चना मोगले,सौ.वैशाली सांगोले,सौ.पुनम अन्नदाते,सौ.सीमा वायकोस,सौ.अश्विनी वायकोस, सौ.संजिवनी बाळशेटे,सौ.लता अन्नदाते,सौ.भारती भाकरे,सौ.लता महाजन,सौ.शैलजा सांगोले,सौ.दिपा दलाल, सौ.सारिका दलाल,सौ.प्रतिभा सावळकर,सौ. सारिका डिकेकर, श्री दिगंबर क्षीरसागर, श्री प्रवीण गोसावी, श्री संजयजी महाजन, श्री राजकुमार वायकोस, श्री दिलीप ऐखंडे, श्री दगडुजी वायकोस, श्री जीवंधर कोरडे, श्री अशोक वायकोस, श्री दिपक वायकोस, श्री दिगंबर वायकोस श्री राहुलजी जोगी, श्री राजकुमार लिंगायत, श्री संदिप एस वायकोस, श्री सतीष जोगी, श्री दिलीप संगवे, श्री प्रशांत संघई, श्री स्वप्नील अन्नदाते,सौ मीनाताई साहूजी,सौ मिनाक्षी उदगीरकर,सौ आशा दलाल,सौ शुभांगी ऐखंडे,सौ अरुणा संगवे,सौ. संगीता बाळशेटे , सौ.विद्या अन्नदाते,सौ.मंदा वायकोस,सौ मंगला क्षीरसागर,सौ.दर्शना संघवी,सौ छाया वाटपाडे, सौ जयश्री हुडवेकर, सौ.शुभांगी इंगलवार,सौ.मंजु सिंगलकर, सौ विद्या मेहेत्रे,सौ प्रविणा अन्नदाते, सौ मीना आहेरकर, श्री अनील बुर्से, प्रकाश धुमाळ यांची नियुक्ती करण्यात आली असुन सर्व कार्यकर्ते यशस्वीतेसाठी प्रयत्न शील आहेत, प्रगती महिला मंडळ अध्यक्षा सौ सविता गोसावी यांच्यासह मयुर पार्क येथील महिला मंडळ,पीसा देवी येथील स्वस्ति महिला मंडळ सहकार्य करीत आहे.

(पान १ वरून)

### राज ठाकरेंविरोधात सुप्रीम कोर्टात...

भडकवण्याचा व द्वेष पसरवण्याचा प्रयत्न केला. यामुळे महाराष्ट्रात भाषेच्या मुद्यावरून तणाव वाढवल्याप्रकरणी राज यांच्यासह मनसेच्या कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी या याचिकेद्वारे करण्यात आली आहे.

राज ठाकरे यांच्या भाषणांमुळे लोकांना रस्त्यावर येण्याची प्रेरणा मिळते आणि त्यानंतर हिंदीला विरोध म्हणून मराठी न बोलणाऱ्या किंवा इतर राज्यांमधून आलेल्या लोकंवर मराठी लादण्यात येते, असा आरोपही या याचिकेत करण्यात आल्याचा दावा आयएएनएसने आपल्या वृत्तात म्हटले आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे राज ठाकरे यांच्याविरोधात ३ वकिलांनी नुकतीच पोलिस महासंचालकांकडे तक्रार दाखल केली होती. या तक्रारीत राज यांची काही विधाने सामाजिक अशांततेला प्रोत्साहन देणारी तथा सामाजिक सलोखा व सुव्यवस्थेला बाधा पोहोचवणारी असल्याचा दावा करण्यात आला होता. या प्रकरणी त्यांच्यावर राष्ट्रीय सुरक्षा कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणीही करण्यात आली होती.

राज ठाकरे यांची शुक्रवारी मीरा भाईंदर येथे सभा झाली. त्यात त्यांनी मराठीच्या मुद्यावरून भाजप खासदार निशिकांत दुबे यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. भाजपचा दुबे नावाचा एक कोणता तरी खासदार म्हणाला, मराठी लोकांना आम्ही पटकून पटकून मारू. त्याच्यावर केस झाली का? हिंदी चॅनलवाल्यांनी त्यांचे चालवले का? त्याचे वक्तव्य दाखवले का? काहीही नाही. बघा हे कसे असतात. तू आ म्हाला पटक पटक के मारणार? मी दुबेला सांगतो. तुम मुंबई आ जाओ. मुंबई के समंदर में डुबे डुबे कर मारेंगे, असे राज ठाकरे म्हणाले होते.

### राष्ट्रवादीच्या विलिनिकरणावर...

त्या वेळेला महायुती अबाधित राहून निवडणुकीला समोर जाऊ अशी चर्चा झाली. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यामध्ये राजकीय परिस्थिती वेगवेगळी आहे. जिल्ह्यातल्या मतदारसंघातील परिस्थिती सुद्धा वेगळी आहे. तिन्ही पक्षातील नेत्यांनी असं ठरवलं की ज्या त्या जिल्ह्यातील राजकीय परिस्थिती त्या त्या नेत्यांकडून समजून घ्यावी, त्यानंतर तिन्ही पक्षातील प्रमुख नेते बसून जिल्हा निहाय निर्णय घेऊ.''

सुनील तटकरे म्हणाले की, अजितदादा राज्याचे मुख्यमंत्री व्हावेत ही माझ्यासहित पक्षातील प्रत्येक कार्यकर्त्याची इच्छा आहे. परंतु आम्ही राजकीय वास्तववादी आहोत, जमिनीवरती आहोत. आम्हाला वास्तव कळतं. भाजपचे १३१ आमदार आहेत, शिवसेनेचे ६० आमदार आहेत आणि राष्ट्रवादीचे ४१ आमदार आहेत. त्यामुळे आघाडीच्या युतीच्या राजकारणाची अपरिहार्यता कशी होईल त्यावर हे सगळं अवलंबून आहे.

दरम्यान, सुनील तटकरे यांच्या वक्तव्याचं मंत्री छगन भुजबळांनी समर्थन केलं. तीनही पक्ष सत्तेत एकत्र आहोत, त्यामुळे विचारलं गेलं तर ठीक आहे असं भुजबळ म्हणाले. तर फडणवीसांच्या बैलगाडीला जुंपलेल्या बैलांना चारा खायचा असेल तर विचारावंच लागेल असा टोला काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी लगावला.

### नाशिक हनी ट्रॅप प्रकरणाची....

मंत्री या हनी ट्रॅपमध्ये आहेत. त्याचे केंद्रबिंदू नाशिक, ठाणे आणि मुंबई आहे. महाराष्ट्रातले महत्त्वपूर्ण दस्तऐवज या हनी ट्रॅपमुळे असामाजिक तत्त्वांच्या हाती गेले आहेत. त्याचा परिणाम महाराष्ट्राला भोगावे लागणार आहे. महाराष्ट्राला धोका निर्माण झालेला आहे. ती गोष्ट आम्ही विधानसभेच्या माध्यमातून सरकारला सांगत होतो. मी पेन ड्राईव्ह दाखवला त्यावेळेस अध्यक्षांनी मला नको नको नको, ते आपल्याकडेच ठेवा, असे म्हटले. त्यावेळेस माझ्याकडे पेन ड्राईव्ह मागितला असता तर मी देऊन टाकला असता. ते आम्हाला जाहीरपणे दाखवता येणार नाही. कारण, अनेक कुटुंब त्यामुळे उद्ध्वस्त होतील. विजय वडेट्टीवार यांनी सांगितलं कारण त्यांच्याजवळ देखील याबाबत माहिती असेल. पण. मुख्यमंत्री हे का लपवत आहे? महाराष्ट्राचे नुकसान का करत आहे? असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला.

### वैष्णवी प्रकरणात तपास करून...

या प्रकरणाच्या तापसापासून सुपेकर यांनी दूर ठेवावे असा अहवालात म्हटलं आहे. सुपेकरांची एक ध्वनीफित प्रसारीत झाली आहे. तिची न्यायवैद्यकीय (फॉरेन्सिक) विभागाकडून तपासणी करून सुपेकरांना निलंबित करून त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा. तसेच त्यांना सहआरोपी करावं, असं अहवालात नमूद करण्यात आला आहे.

### रा.स्व. संघ प्रणित संस्थेतर्फे...

संस्थांचे प्रतिनिधीदेखील या चार दिवसांच्या या कार्यक्रमात सहभागी होतील. शुक्रवारी दिल्लीत एका पत्रकार परिषदेत या कार्यक्रमाची घोषणा करण्यात आली. न्यासचे राष्ट्रीय सचिव अतुल कोठारी म्हणाले की, भारतातील शिक्षण अधिक भारत केंद्रित आणि ज्ञान केंद्रित कसे होऊ शकते याचा शोध घेणे, हा या परिषदेचा उद्देश आहे. ते म्हणाले, ''या परिषदेचा उद्देश पाश्चात्य ज्ञान प्रणालींना विरोध करणे नसून भारतीय विद्यार्थी त्यांच्या परंपरा, संस्कृती आणि ज्ञानात रुजलेले राहतील याची खात्री करणे आहे.''

परिषदेच्या पहिल्या दोन दिवसांत (२५-२६ जुलै) 'चिंतन बैठक' होईल. या बैठकीत काही निवडक सहभागी अभ्यासक्रमाचे भारतीयीकरण, भारतीय भाषांचे संवर्धन, नैतिक शिक्षण आणि पारंपारिक ज्ञान प्रणाली या मुद्द्यांवर चर्चा करतील. शेवटच्या दिवशी म्हणजेच २८ जुलै रोजी खुल्या सत्राचे आयोजन केले जातील, ज्यात या विषयांवर धोरणात्मक चर्चा होईल. केरळमध्ये न्यासचा इतका मोठा शैक्षणिक कार्यक्रम पहिल्यांदाच आयोजित केला जात आहे. केरळ हे आदि शंकराचार्यांचे गृहराज्य आहे आणि कलाडी हे त्यांचे जन्मस्थान आहे. या ठिकाणाला आध्यात्मिक वारसा लाभला आहे. त्यामुळे या परिषदेसाठी या ठिकाणाची निवडही महत्त्वपूर्ण आहे.

शिक्षा संस्कृती उत्थान न्यासची स्थापना २००७ मध्ये करण्यात आली. शिक्षा बचाओ आंदोलनाचा विस्तार म्हणून याची स्थापना करण्यात आली होती. तेव्हापासून शिक्षा संस्कृती उत्थान न्यास शैक्षणिक प्रसारासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख व्यासपीठ म्हणून उदयास आले आहे. शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम चालवणे, शाळांसाठी पूरक साहित्य प्रकाशित करणे आणि वर्गखोल्यांमध्ये भारतीय भाषा व नैतिक शिक्षणासाठी अधिक जागा मिळावी यासाठी लॉबिंग करणे यांसारखे कार्य न्यास करते.